कथासंग्रह

शासनमान्य यादीतील ग्रंथ क्र. १५५/२००५
उत्कृष्ट कथासंग्रह पारितोषिक प्राप्त

# ब्यांडमास्तर



## प्रा.डॉ. पवन मांडवकर

**सुकृत प्रकाशन**
सौ. शालन प्रकाश कदम
'शालीन', परमहंस सोसायटी,
१०० फुटी रोड, सांगली
☎ भ्रमणध्वनी : ९८५०५४११९०

मूल्य नव्वद रुपये

ISBN 978-81-870122-6-0

❋ ब्यांडमास्तर (कथासंग्रह)
**BAND MASTER (Short Stories)**

❋ © प्रा.डॉ. पवन मांडवकर
**Prof. Dr. Pavan Mandavkar**

❋ लेखक - संपर्क - भ्रमणध्वनी : ९४२२८६७६७८
१. 'पद्‌मनिलया', ४२, शिवाजी नगर, यवतमाळ ४४५ ००१
२. इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ ४४५ ४०१
३. विजय कॉलनी, रुक्मिणी नगर, अमरावती ४४४ ६०६

❋ मुखपृष्ठ
डॉ. मनीष चोपडे, अमरावती
❋ मुखपृष्ठ छपाई
मिलिंद डाहाके, नभ प्रिंटर्स, अमरावती

❋ प्रकाशन दिनांक ३ नोव्हेंबर २०२२

❋ प्रकाशक / मुद्रक / वितरक
सुकृत प्रकाशन
सौ. शालन प्रकाश कदम
'शालीन', परमहंस सोसायटी,
१०० फुटी रोड, सांगली
☎ भ्रमणध्वनी : ९८५०५४११९०

❋ मूल्य ११० रुपये

# अंतरंगात शिरण्यापूर्वी ....

'ब्यांडमास्तर' ही कथा वृत्तपत्रांतून प्रकाशित झाली आणि वाचकांच्या प्रतिक्रियात्मक पत्रांचा ढीग लागला. 'आकाशवाणी यवतमाळ'वरून ही कथा प्रसारित झाली आणि त्यानंतरच्या आठवड्यात झालेला 'स्नेहाभिलाषी' हा श्रोत्यांच्या पत्रांचा कार्यक्रम संपूर्ण या कथेवरच झाला. या कथेच्या यशामुळे 'ब्यांड मास्तर' हेच शीर्षक कथासंग्रहाला द्यायचं, हे निश्चित झालं.



या संग्रहातील अनेक कथांना वाचकांनी चांगली दाद दिली आहे. सर्व कथा वृत्तपत्रांतून / नियतकालिकांतून प्रकाशित झाल्या आहेत. बऱ्याचशा आकाशवाणीवरून वारंवार प्रसारितही झाल्या आहेत.

माझ्या विविधांगी कथांपैकी एकाच ढाच्यातल्या किंवा एकाच प्रवाहातल्या निवडक अकरा कथांचे संकलन येथे सादर केले आहे. वाचकांना त्या कितपत भावतात, हे त्यांच्या पत्ररूपी प्रतिक्रियांतून समजेलच; पण सर्वच कथा त्यांच्या हृदयाला स्पर्शून जातील, अशी खात्री मला वाटते.

**– पवन मांडवकर**




# अनुक्रम


| | | |
|---|---|---|
| | अंतरंगात शिरण्यापूर्वी | ३ |
| | अनुक्रमणिका | ४ |
| | आभार | ४ |
| | कथा | |
| १. | ब्यांडमास्तर | ५ |
| २. | वामन मास्तर | १५ |
| ३. | मंतर | २१ |
| ४. | काळूराम | ३१ |
| ५. | नाम्या | ४१ |
| ६. | गेले द्यायचे राहून | ५० |
| ७. | दुष्काळ | ५९ |
| ८. | बाई | ६७ |
| ९. | संगीता | ७६ |
| १०. | बाल्या झोळी बाल्मिकी ऋषी झाला | ८६ |
| ११. | पुरस्कार | ९२ |


## आभार

आकाशवाणी यवतमाळ, आकाशवाणी नागपूर, दै. लोकमत, नागपूर, दै. नवराष्ट्र, नागपूर, दै. हिंदुस्थान, अमरावती, दै. महाविदर्भ, अमरावती, दै. लोकदूत, यवतमाळ, दै. देशोन्नती, अकोला, 'बहर', २९ वे राज्यस्तरीय अंकुर साहित्य संमेलन (यवतमाळ) विशेषांक २००१, 'अंतरंग' (दीपावली विशेषांक), पुसद, 'एकता' (दीपावली विशेषांक), पुणे, दीप प्रतिष्ठान (दीपावली विशेषांक).





# ब्यांडमास्तर

"बारक्या, आरं ए बारक्या, झाला का तैय्यार?"

"हौ, हौ, आलोच ब्यांडमास्तर."

"आरं चाल की लौकर, समदी वाट बगत असत्याल. शेटजीकडचं लगीन हाय न्हवं? येळेवर पोचायला पायजेल. आज लय पैका मिळंल बग. लई शिरीमंत हाय शेटजी."

"चाला ब्यांडमास्तर, बिगीनं जाऊ."

"आरं म्या इसरलोच की, तुह्यावाली छाती दुखून राह्यली व्हती ना कालदी?"

"आवो मास्तर, आपलं जिनंच हाय हे, फुकणी फुकू फुकू छाती तं दुखनारच."





"आरं, पन कायजी नोको का घेयाला?"

"मास्तर, आज शेटजीकडचं लगीन हाय म्हनता ना? मंग लय पैका मिळंल आपल्याले. आनू म्या म्हनलं का आराम करतो, तर कसं जमंन? आवं आपला ब्यांड म्हंजी आपली इज्जत. ती राखाया होवी ना? आपल्या ब्यांडचं नाव खराब व्हायाला नोको. खरं का नाय?"

"व्हय रं बाबा, तू म्हनतोस त्येबी खरंच हाय. चाल आता, पन जास्त जोरानं फुकू नगंस माज्या राजा."

"तुमी कायबी कायजी करू नोका मास्तर."

बोलत बोलत बारक्या आणि ब्यांडमास्तर रस्त्याच्या कोपऱ्यावर आले. तिथे दगडू अवाढव्य ढोलकं गळ्यात लटकवून उभा होता. म्हावऱ्यानं बाजाची पेटी जमिनीवर ठेवली होती. नाच्या आपल्या घुंगराशी चाळा करीत या दोघांची वाट बघत होता. त्यांच्याजवळ पोचताच ब्यांडमास्तरने जमिनीवर ठेवलेला आपला जुनापुराणा भोंगा आणि बॅटरी वायरसह उचलली आणि ते रस्त्याला लागले.

"आरं दगडू, तुह्या हाताचे फोडं बसले का न्हाय बाबा?"

"बसतील मास्तर, आज ना उद्या. तेची कोन फिकर करतं? पन ह्या म्हावऱ्याकडं पा, कालपास्नं लय तपलाय. डागतरकडंबी जात न्हाई आनू आरामबी करत न्हाई."

"आरे दोस्तांनो, माह्या तापाची कायले फिकर करता? आज शेटजीकडचं लगीन आपून घेतलंया. आज असा ब्यांड वाजवूया का आनखीनू धा आडरी भेटल्या पायजे, काय ब्यांडमास्तर?"

"व्हय रं पोरांनो, तुमी लय लय करता माह्यासाठी."

"ए ब्यांडमास्तर, तुले कितीक डाव सांगलं का असं बोलाचं न्हाई मून? आरे, तूच तर आमाले कचऱ्याच्या कुंडीतून काहाडून इथपर आनलं. हे वाजवाले शिकोलं. आमची पोट भऱ्याची सोय तुनंच केली ना? आनू आता उलटा म्हनतो का आमीच तुह्यासाठी खूप करून राह्यलो. आरे छाटू, आमीतर तुह्यासाठी कायबी केलं नाय. आमीतर स्वार्थी हावो गड्या. आमच्या पोटाची भूक भागते, म्हून तुह्यासोबत ब्यांड वाजवाले येतो बा."

"मले उमजते रे बाळांनु, पर तुमी इतली जिवापाड मैनत करता, तरी तुमाले लय पैका नाय मिळवून देऊ शकत मी. फुकून फुकून बारक्याची छाती आनू गाल कसे जाले बगा. ढोलकं वाजवू वाजवू दगडूच्या हाताले फोडं आले आनू म्हावऱ्याबी कस्टानंच बिमार पडला हाय. तरी मी दुस्ट मानूस तुमाले ब्यांड वाजवाले नेऊन रायलो."

"मास्तर, मास्तर, बस झालं आता. आमचे बाप आहा तुमी. का बापाले येवढा अधिकार न्हाई, पोरायकडून काम करून घ्याचा?"

"ब्यांडमास्तर, ते पा बस येऊन ऱ्हायली. चाला लौकर."

"आरं दगडू, तो न्हाय घेनार आपल्याले या सामायनासगट."

"पन पर्यत्न कराले काय जाते?"

"तिकिटाचे धा रुपयेबी द्या लागतीन, मास्तर."

"पैशाची फिकीर नोका करू. बारक्या, आज शेटजीच्या घरी लय कमाई होनार हाय आपली. तिथं येळेवर पोचा लागंन. आंदीच तर उशीर झाला हाय, आनू त्यात तुमी दोघं बिमार हात. चाला, यष्टीनंच जाऊ."





आपलं सामान सावरीत ब्यांड एस.टी.त चढू लागला. तोच कंडक्टर ओरडला,

"ए ब्यांडवाले, निचे उतरो. उपर नही चढनेका. गाडी फुल्ल है. जगे नही है, दिखता नही क्या? इतना सारा सामान लेके नही चढना, निचे उतरो."

"पर दादा, आमाले लगनात ब्यांड वाजवाले जायाचं हाये. येळेवर न्हाय पोचलो तर शेटजी काय म्हनंल? आमच्या रोजीरोटीचा सवाल हाय, दादा. कसंबसं उभं राहू आमी."

"ए गवरमेंटने क्या तुम्हारा ठेका लेके रखा है? चलो उतरो फटाफट." असे म्हणत कंडक्टरने ब्यांडमास्तरला ढकलून दिले. ब्यांडमास्तर धडपडत बाजूला पडला. धूर आणि धूळ ओकत बस निघून गेली. बारक्याने मास्तरांना हात देऊन उठवलं.

"कायबी वाईट वाटून घेऊ नका, मास्तर. हरामाचा पैका घेनारे नरकात जातीन. चाला आपून जाऊ पैदल पैदल. आजून काय आमी लंगडे झालो न्हाय."

"चाला मास्तर, गांधीजी दांडीयात्रेत पैदलच चालले ना? आपून तं जवान हावोत. चाला बिगीबिगी."

लवकरच ब्यांड लग्नमंडपात पोचला. शेटजी वसकन ओरडला,

"ए ब्यांडमाष्टर, तुम इतना लेट क्यौं आया? अब जादा देरतक ब्यांड बजाना पडेगा. चलो शुरू करो, बहोतसारे मेहमान आ चुके है."

ब्यांडमास्तरने बॅटरीला वायर जोडून भोंगा सुरू केला.

"म्हावऱ्या, बारक्या, चला करा बाबांनू सुरू."

ब्यांड वाजू लागला. सगळेजण अगदी प्राण ओतून आपापली वाद्ये वाजवू लागले. एवढ्या दुरून पायीपायी आलेल्या ब्यांडला तहान लागली होती. पोचल्याबरोबर नाश्ता मिळेल, कप कप चहा मिळेल, एखादी बिडीकाडी मिळेल आणि थोडासा आराम करून सुर जुळवू, ही त्यांची स्वप्ने धुळीला मिळाली.

"नाच्या, सुरू हो."

ब्यांडमास्तरची सूचना होताच अनवाणी नाच्या घुंगरांच्या तालावर नाचायला लागला. ब्यांडच्या नजरा या श्रीमंत वऱ्हाड्यांपैकी कुणी रुपया-दोन रुपये देईल, या आशेवर भिरभिरू लागल्या. नाच्या अगदी बेभान होऊन नाचू लागला. आज त्याला ब्यांडपार्टीला भरपूर कमाई करून द्यायची होती. पैसेवाल्यांच्या घरचं लग्न होतं. नाच्याचा नाच पाहून पाहुणे मंडळी - विशेषतः लहान मुले आणि तरुण मंडळी खुष झाली. तेवढ्यात नाच्याच्या पायात एक फुटकी काच भसकन घुसली. रक्ताची चिरकांडी उडाली. नाच्याच्या डोळ्यात टचकन पाणी आलं. वेदनेनं तो विव्हळला. ब्यांडमास्तरचं त्याच्या पायाकडे लक्ष गेलं आणि तो ओरडला,

"आरं नाच्या, थांबव तुझा नाच. पायातनं केवढं रगत येतंय बग."

"नाय मास्तर, आज नोका थांबवू. आपल्याला लय पैका भेटनार हाय. आपल्या ब्यांडच्या इज्जतीचा सवाल हाय."

नाच्या बेफाम नाचत राहिला. बारक्या, दगडू अगदी प्राण पणाला लावून ब्यांड वाजवत होते. दगडूचं ढोलकं आज फुटणार तर नाही? पिपाणी फुंकून फुंकून बारक्याच्या गालांची काय वाट लागेल? अशा काळजीत ब्यांडमास्तरचा जीव खालीवर होत होता.





बऱ्याच वेळानंतर वऱ्हाडी मंडळींतील काही तरुण-तरुणींमध्ये उत्साह निर्माण झाला. एक एक करीत ते नाच्याबरोबर नाचात सामील होऊ लागले. ब्यांडची नजर मात्र कोण पैसे ओवाळून टाकतंय, याकडे होती. संथगतीने रुपया-दोन रुपयाच्या नोटा पडू लागल्या. त्या पाहून ब्यांडला जोश चढला. लय वाढली. नाच्या आणखी वेगाने नाचू लागला. त्याची रक्ताळलेली जखम मातीनं बुजून गेली होती. पाच-दहा रुपयांच्या नोटा मिळतील, या आशेने त्याच्या वेदनांवर पांघरूण घातलं होतं.

"और जोरसे बजाव, और बजाव" अशी तरुणांची फर्माईश पुरी करता करता पाच तास कसे निघून गेले कळलंच नाही. तिकडे मांडवात लग्न लागलं. मधल्या फुरसदीत ब्यांडला जेमतेम पाणी प्यायला सवड मिळाली. स्वखर्चानंच बिडीकाडी झाली. काही फराळपाणी मिळेल, या आशेवर पाणी फिरलं. मालक मंडळींपैकी कुणी विचारायलाही आलं नाही. ओवाळून मिळालेले किती रुपये झाले असतील, याचा विचार ब्यांडमास्तर करीत होता. तिकडे जेवणावळी उठत होत्या. आपल्याला केव्हा जेवण मिळेल, याकडे ब्यांडच्या नजरा लागल्या होत्या. असे दोन-अडीच तास निघून गेले.

पंचपक्वान्नांवर ताव मारून वऱ्हाडी मंडळी पांगू लागली. नववधू सासरी जायला निघाली. शेवटची 'बाबूल की दुवाएँ लेती जा' आणि 'जा मुली जा, दिल्या घरी तू सुखी राहा' या धूनपण अगदी करुण स्वरांत ओथंबून निघाल्या. ब्यांडने त्या इतक्या जीव ओतून वाजवल्या की, नवरीच काय पण बायांबरोबर पुरुषांच्या डोळ्यांतूनही अश्रू बाहेर पडले.

सोहळा संपला. ब्यांडच्या जेवणाची कुणीही चौकशी केली नाही. वरात निघून गेल्यावर शेठ आला.

"ए ब्यांडमाष्टर, ये ले पैशा."

"शेटजी, ये तो देडसोच है."

"तो फिर? देडसौही ठहराये थे ना?"

"पन मालक, आमीतर सहा-सात घंटे ब्यांड वाजोला. तीन घंट्याचे दीडशे रुपये ठरोले होते."

"तो क्या हुआ? उसकी बक्षिशीमें तुमको लोगोंने नोट दिये ना?"

शेटजीचं टर्रेल उत्तर ऐकून इथे वाद घालून काही उपयोग नाही, याची जाणीव ब्यांडला झाली. भुकेल्या पोटाला आणि थकलेल्या देहाला आपापल्या पायांवर उचलून निमूटपणे ब्यांड निघाला. कुणीच कुणाशी बोलत नव्हतं. बराच वेळ पायी चालल्यावर एका धाब्यापाशी त्यांचे पाय थबकले.

"ब्यांडमास्तर, चाला थोडा वेळ बसुया. काही खाऊपिऊ."

"नाही रे पोराईनू, आधीच आपल्याले पैका कमी भेटलाय. त्यात तुम्हा लोकाईला डाक्टरकडं न्याचं हाय. नाच्याच्या पायाचं, बारक्याच्या दुखणाऱ्या छातीचं, म्हावऱ्याच्या तापाचं नि दगडूच्या बायकूच्या दुखण्याचंबी बगावं लागंल. दगडूची बायडी वाट बगत आसल. साऱ्याईच्या दवापान्याला हे दीडशे रुपडे कसे पुरतीन, याचीच फिकर लागलीया."

"ते इसरा मास्तर आता."

"अरे राजा, ते इसरनं इतलं सोपं हाय का?"

"मुन्नच तं म्हन्तो, मास्तर, चाला, थोडी थोडी घेऊ आन् इसरूया दुख. दुसरं हाय काय आपल्या हाती?"

"व्हय मास्तर, चाला, आजच्या रोज न्हाई म्हनू नोका."





दिवसभर उपाशीपोटी जिवाच्या आकांतानं ब्यांड वाजवणाऱ्यांनी घोट घोट चढवली. लवकरच ती त्यांच्यावर चढली.

"पाहिलंत ब्यांडमास्तर, तुमी म्हनं का लय पैका भेटनार हाय. शेटजीकडचं लगीन, पैशाला काय कमी? पन आपल्याला काय भेटलं? ना ज्येवन, ना च्यापानी, फकस्त तीस-तीस रुपडे आले. ओवाळनीचे पन सारे मिळून धा-धा रुपये. मी म्हन्तो, काय मतलब हाय असल्या जिनगानीचा?"

"बारक्या, लगीन शेटजीकडलं आसो का सावकाराकडलं आसो, का आन्खी कुनाकडलं, साऱ्याईकडे सारकंच. आपल्याले कुनी न्हाई पुसत. आपल्या ब्यांडाविना त्यायचं होत न्हाई; पन आपली कदर न्हाई कुनाला."

"मास्तर, असल्या जिनगानीले तं संपूनच टाकाले पायजे. आमच्याशी लगीन कराले कोनी तयार होत न्हाई. या एका दगडूचं झालं, तं त्याची बाई सदा आजारीच. आम्ही ब्यांडवाले, पैका इष्टेट न्हाय आमच्याकडं म्हून बेकारांत गिनती."

"आरं पोरांनु, आसं नका बोलू. आज ना उद्या तुमीबी ब्यांडमास्तर व्हान. तुमच्याकडंबी धा वाजवनारे रायतीन. एक दिस तुमीबी मोठे व्हान."

"जाऊ द्या मास्तर, मोटं होऊन का कराचं? पायले मोटे मान्सं कशे आसते तं! आरं हट्, यापरीस तं कुत्र्याची जिनगानी बरी."

"आरं बारक्या, आपल्यासिवाय एकाचं तरी लगीन, कारेक्रम पार पडता का? लोकाईचं मनूरंजन करासाठीच आपला जलम हाय. आपल्याले हिथं कुनी पुसलं न्हाई, तरी सर्गात नक्कीच जागा भेटंन. असे रुसू नोका पोरांनू."

"मास्तर, साऱ्या जिनगानीत तुमी लय दुख भोगलं,

तरी सिव्या-सराप तुमच्या तोंडून निगत न्हाईत. लई परवित्र इचार हाय तुमचे. आमचे देव हात मास्तर तुमी.”

“मास्तर, आमी देव तं काई पायला न्हाई; पन खऱ्या देवाचं रूप आमाले तुमच्यातच दिसते. म्हनून तं जिते हावोत आजपावेतर.”

मदिरेच्या आहारी गेलेला ब्यांड ढसाढसा रडू लागला आणि एकमेकांना सावरू लागला. जेमतेम तर्री मारलेली अंडाभुर्जी खाऊन मटणबिर्याणी खाल्ल्याचे समाधान मानून सगळे लडखडत, अडखळत घराकडे परतले. दगडूची बायको हातात लाटणं घेऊन उभीच होती. तोही प्रसाद दगडूने मुकाट्याने पचवला. ब्यांडमास्तरनं वडिलकीच्या नात्यानं तिला खूप समजावलं. तिलाही ते सगळं उमजत होतं; पण परिस्थितीशी लढता लढता तीही बेजार झाली होती. मंडळी आपापल्या झोपडीत गेली. रात्रीच्या काळचाभोर अंधारानं आपलं पांघरूण काही तासांसाठी त्यांच्यावर घातलं. धरतीमातेच्या कुशीत निद्रादेवीने त्यांच्यावर विनाविलंब कृपा केली.

कोंबडा आरवला.

“बारक्या, दगडू, आरं चाला लौकर. आज पाटलाकडचं लगीन हाय. लय पैका भेटंन. आरं पन इसरलोच की, बारक्या, तुही छाती दुखून राह्यली नं?”

“मास्तर, फुकनी फुकू फुकू छाती तर दुखनारच हाय. पर पोटाची सोय नोको का? चाला आजतरी लय पैका भेटंन. डागतरकडं जायला पैका नोको?”

“नाच्या बेटा, आज तू आराम कर. काल लई रगत सांडलं तुझं. पायबी दुखत असंल.”

“आरे नाय मास्तर, आज तं लय पैका भेटनार हाय. पायाले पट्टी बांधून मी नाचीन. आपल्या ब्यांडच्या इज्जतीचा





सवाल हाय, मास्तर. चाला रे दगडू, बारक्या, म्हावऱ्या मस्त ब्यांड वाजवा. मालक खुस झाला तं लय पैका भेटंन.”

“चाला, चाला लौकर, ब्यांडच्या इज्जतीले धक्का लागाले नोको.”

पूर्वप्रसिद्धी :

१. ‘साहित्य मैफील’ दै. हिंदुस्थान, अमरावती,
रविवार, दि. ११ जून, २०००

२. ‘साहित्यरंग’, दै. लोकमत, नागपूर,
रविवार, दि. २३ सप्टेंबर, २००१

३. ‘साहित्य स्पंदन’, दै. देशोन्नती, अकोला,
रविवार, दि. २१ जुलै, २००२

आकाशवाणी प्रथम प्रसारण :

आकाशवाणी यवतमाळ, शुक्रवार, दि. ३० सप्टेंबर, २०००









# वामन मास्तर

आपल्या जाड भिंगाच्या चष्म्याची काडी नाकावर व्यवस्थित बसवत वामन मास्तरांनी समोरच्या बंगलीच्या फाटकावरील पाटी जरा मोठ्यानंच वाचली - 'शिवानी हाऊस'.

'' कोण पाहिजे आपल्याला?'' वॉचमननं जरा दरडावणीच्या सुरातच विचारलं.

''बाईसाहेब आहेत का?'' आपले किंचित थरथरणारे ओठ वामन मास्तरांनी उघडले.

''हो, या आत.'' हळुवारपणे फाटक उघडीत वॉचमन म्हणाला, ''बाईसाहेब बगिच्यात वाचन करीत आहेत.''

भीतभीतच पावले टाकीत वामन मास्तरांनी बागेत





प्रवेश केला. त्या आकर्षक टुमदार बंगलीला न्याहाळत, रंगीबेरंगी फुलांनी बहरलेल्या फुलझाडांचा नजरेनं आस्वाद घेत हिरवळीवरून संथ चालत वामन मास्तर बाईसाहेब जिथं आरामखुर्चीत बसून वाचन करीत होत्या, तिथं पोचले. कुणीतरी आल्याची चाहूल लागताच बाईसाहेबांनी वृत्तपत्र बाजूला सारलं, चष्मा नीट केला आणि मास्तरांकडे निरखून पाहू लागल्या.

''अरे वामन तू?'' ओळख पटताच बाईसाहेब उद्गारल्या. वामन मास्तरांनी दोन्ही हात जोडून चेहऱ्यावर कसंबसं स्मित पसरवलं. परिस्थितीला ठिगळ लावण्याचा त्यांचा तो प्रयत्न बाईसाहेबांच्या चाणाक्ष नजरेतून सुटला नाही.

''अरे बस ना, वामन. असा उभा का?'' समोरची खुर्ची पुढे सरकावीत त्या बोलल्या.

मास्तर शांतपणे शिवानी बाईसाहेबांनी सरकवलेल्या आरामखुर्चीत बसले. बराच वेळ काय बोलावं, हे न सुचल्यानं दोघंही एकमेकांना केवळ न्याहाळत राहिले. मास्तरांच्या लक्षात आलं, की पूर्वीची शिवानी आणि समोरच्या बाईसाहेब यांच्यात फारसा बदल झालेला नाही. अजूनही डोळ्यातली पूर्वीचीच चमक, तेच सफरचंदी गोबरे गाल, काळेभोर रेशमी केस, निकोप सुदृढ बांधा आणि तेव्हा होती तशीच उच्चस्तरीय राहणी. तिच्या वयाची पन्नाशी उलटली आहे, हे खरंच वाटू नये.

''वामन, किती वर्षांनी भेटतो आहेस रे?'' शांततेचा भंग करीत बाईसाहेब म्हणाल्या. '' कुठे असतोस? काय करतोस? आणि काय रे दशा करून घेतली आहेस शरीराची? पूर्वीचा काटकपणा कुठे गेला? डोळ्यातलं ते विद्वत्तेचं तेज? या जाड भिंगाच्या चष्म्यानं किती म्हातारा दिसतो आहेस तू? ओळखूसुद्धा येत नाहीस.''

शिवानी बाईसाहेबांच्या प्रश्नांचा भडिमार वामन

मास्तरांना सहन झाला नसावा. आपली थरथरणारी मूठ हातातल्या गोणपाटाच्या थैलीवर अधिकच आवळून धरीत त्यांनी खाली मान घातली.

''वामन, असा कसा झाला रे तू मिळमिळीत? रसरशीत तारुण्याचा लोप पन्नासाव्या वर्षीच एवढ्या प्रचंड प्रमाणात होऊ शकतो? अरे, कुठे गेला तुझा तो चळवळ्या स्वभाव? तुझे ते नेतृत्वाचे गुण? किती ॲक्टिव्ह होतास तू? आणि आता असा खाली मान घालून एखाद्या निराश वृद्धासारखा, थकल्यासारखा काय बसला आहेस?" बाईसाहेब बोलतच राहिल्या.

मास्तरांच्या पापण्या ओलावल्या. मन नकळत भूतकाळात शिरलं. शिवानी ही वामनची शिक्षण महाविद्यालयातली सहपाठी. बी.एड.च्या एकाच वर्षात खूप घटना घडल्या होत्या. वामन वर्गप्रतिनिधी होता. वर्षभर त्याने विविध कार्यक्रमांत सहभाग घेऊन सर्वांची प्रशंसा मिळवली होती. स्वतःबरोबरच इतरांनाही पुढे आणण्यासाठी तो सतत प्रयत्नशील होता. त्यामुळेच तो वर्गप्रिय झाला होता.

वामन आणि शिवानी कार्यक्रमांमुळे वारंवार एकत्र येत होती. त्यातूनच वामन तिच्यामध्ये गुंतत गेला. शिवानीच्या मनात काय आहे, ते मात्र त्याला कधीच कळलं नाही. ती एका सरकारी अधिकाऱ्याची एकुलती एक कन्या. गडगंज संपत्तीची वारसदार. तसा वामनही एका मध्यमवर्गीय कुटुंबातला. तब्येतीने उत्तम, स्वभावाने निर्मळ, दिलखुलास हसणारा आणि इतरांना हसवणारा, प्रत्येक कार्यक्रमात भाग घेणारा असा 'मोस्ट ॲक्टिव्ह पर्सन'. वामनने शिवानीलाही प्रत्येक कार्यक्रमात सहभागी करून घेतल्याने ती दोघेही पुढे जीवनात चांगले नाव कमावतील, अशी सगळ्यांची धारणा झाली होती.

वर्षभर एकत्र कामे केली, अभ्यास केला तरी





परस्परांच्या मनाचा थांग मात्र त्यांना लागला नाही. बी.एड. होताच दोघांच्याही जीवनाचे मार्ग बदलले. संपर्क तुटला. आणि आज तब्बल पंचवीस वर्षांनंतर ही भेट झाली होती.

''पाईनॲपल घेतोस ना?'' सखारामने आणलेल्या ट्रेमधील ग्लास पुढे करीत शिवानी बाईसाहेब बोलल्या. मास्तर भानावर आले. दुपट्ट्याने डोळे पुसून त्यांनी शेकचा ग्लास हाती घेतला. आता त्यांनी एकेरी संबोधण्याची हिंमत केली.

''शिवानी, अग कालच मला तुझा पत्ता मिळाला, म्हणून लगेच शोध घेत आलो बघ. इथं कोण कोण आहे तुझ्या घरी?''

''हे आणि मी. आम्ही दोघंच असतो या बंगल्यात. बँक मॅनेजर आहेत ना हे, त्यामुळे नोकर-चाकर, गाडी-बंगला सगळं सुखासीन जीवन आहे.''

''आणि मुलं?'' मास्तरांनी भाबडा प्रश्न केला.

''अरे, मुलगा नुकताच हायर मेडिकल स्टडीजसाठी अमेरिकेला गेलाय आणि मुलगी मुंबईला एम.बी.ए. करतेय. त्यामुळे इथे आम्ही दोघंच आहोत. पण तुझं कसं काय सुरू आहे? काय म्हणतो संसार? बायको, मुलबाळं वगैरे?''

प्रश्न ऐकताच मास्तरांनी एका घोटात शेकचा ग्लास रिकामा केला. रिकाम्या ग्लासकडे बघतच ते बोलू लागले,

''बी.एड. चांगला फर्स्ट क्लासमध्ये पास झालो आणि माझ्यावर समस्यांनी जणू आक्रमणच केलं. चार महिन्यांत एका अपघातात आईबाबा दोघेही गेले. नोकरी नसल्यामुळे भाऊ-भावजय घालून पाडून बोलायला लागले. वहिनी तर शिळंपातं खायला घालायची. कॉलेजमधली माझी धडाडी, मिळालेली पारितोषिके, प्रशंसा सगळी फुकट गेली. घर सोडून बाहेर पडलो, तर जुने मित्र, मैत्रिणी, प्राध्यापक कुणीच मदतीचा हात दिला नाही.

सहजासहजी नोकरी मिळत नव्हती. जीवन मार्गावरील अनेक काट्यांना, दगडधोंड्यांना तुडवीत जवळपास चार वर्षे काढली. त्या काळात मी कसा जगलो कुणास ठाऊक? एकाकी जीवन खायला उठत होतं. शेवटी एका लहानशा खेड्यात मास्तरकी मिळाली. नोकरी मिळूनही समस्या सुटल्या नव्हत्या. आर्थिक पाठबळ फारसं नव्हतंच. पगारही नियमित आणि पुरेसा नव्हता. कसाबसा हिंमत करून एक दिवस तुझ्या घरी गेलो तर कळलं की तू लग्न करून पुण्याला गेलीस. मोठ्या आशेनं गेलो होतो; पण निराश होऊन परतावं लागलं. जगण्याची होती, नव्हती ती उमेदही नाहीशी झाली. आपलं म्हणणारं कुणीच उरलं नव्हतं या जगात. लग्न करायचंच नाही, असं ठरवून टाकलं. कॉलेज काळात जे असंख्य सहकारी अवतीभोवती गुंजारव करीत होते, ते आपत्तीच्या वेळी तोंड फिरवून गेले. शिक्षकी पेशा पत्करला होता, तोच प्रामाणिकपणे निभवायचा, एवढंच माझं ध्येय उरलं. आजही त्याच खेड्यात, त्याच झोपडीत 'एकला चालो रे'चं जीवन जगतोय मी.''

मास्तरांची कहाणी संपली. शिवानीचे डोळे पाणावले. गहिवरल्या आवाजात ती म्हणाली,

''बी.एड.ला शिकत होतो, तेव्हा 'नव्या पिढीचे शिल्पकार' म्हणून मोठ्या गौरवानं आपला उल्लेख व्हायचा. पण प्रत्यक्ष जीवनात हा शिल्पकार स्वतःच दुःखसागरात गटांगळ्या खातोय, हे प्रत्यक्ष अनुभवतेय मी. वामन, त्यावेळी तुझ्या मनाची पुसटशी कल्पना आली होती मला. आणि कधीतरी तू बोलून दाखवशील, याची वाट बघत होते मी. पण परीक्षा होऊन गेल्या. आपण आपापल्या गावी परतलो. तरी तू काहीच बोलला नाहीस. मला तर पुढाकार घेणं शक्यच नव्हतं. आपला समाज पंचवीस वर्षांपूर्वी आजच्या इतका प्रगत कुठे होता? आईवडील बांधतील त्या गोठ्यात जाऊन स्थिरावायचं, हे आमचं स्त्रीजीवन. आणि






तुझं-माझं अबोल प्रेम कदाचित नियतीलाच मंजूर नसावं. मी तर जीवनात चांगली सुखावले; पण तुझ्यासारख्या सद्वर्तनी, सुस्वभावी, सतत इतरांसाठी झटणाऱ्याला नियतीच्या खेळानं या स्थितीला पोचवलं, याचंच वाईट वाटतंय रे.''

दोघेही बराच वेळ आपापल्या विचारांत गप्प बसून राहिले. शेवटी भानावर येत वामन मास्तर आपली गोणपाटाची थैली खांद्यावर लटकावीत उभे राहिले. दोन्ही हात जोडून त्यांनी शिवानीला नमस्कार केला. खिळे मारून मारून खिमा झालेल्या चपला पायात अडकवल्या. जाड भिंगाचा चष्मा नाकावर नीट सावरला आणि जड पावलांनी चालू लागले. 'याला जीवन ऐसे नाव' असा विचार करीत शिवानी बाईसाहेबही एक चकार शब्द न बोलता खुर्चीला खिळून बसल्या.

तुटक्या चष्म्याच्या काडीला, टायरच्या झिजलेल्या चपलांना आणि हातातील गोणपाटाच्या थैलीला ठिगळं लावून वापरू शकले असते वामन मास्तर; पण आरपार दुभंगलेल्या हृदयाला आणि नियतीच्या आघातानं सैरभैर झालेल्या मनाला ठिगळ लावणं त्यांच्या हाती नव्हतं, कधीच नव्हतं.

पूर्वप्रसिद्धी :
१. 'साहित्य मैफील' दै. हिंदुस्थान, अमरावती,
रविवार, दि. १९ नोव्हेंबर, १९९५
आकाशवाणी प्रथम प्रसारण :
आकाशवाणी यवतमाळ, शुक्रवार, दि. १७ एप्रिल, २००१



# मंतर

"काऊनजी, तुमी तं बोलूनई नाई रायले माह्याशी."

"हे पाय रुक्मे, तुले मी मांगंच सांगतलं व्हतं का मले फटफटी घ्याची हाये. तुह्या बावाजीकडनं पैशे आन, तं तू काई मनावर घेतच नाई."

"नाईजी, तसं नाई. पर माह्या बावाजीजोळ इतला पैका कुठचा यीन? आपल्या लगनातच काहाडलेलं कर्ज फिटलं नाई आजून."

"थे काई तू मले सांगू नोको. तुले जर अथी सुखानं नांदाचं असंन तं तुले पैशे आनाच लागंन. तरी मी काई नवी फटफटी घेऊन नाई रायलो. जुन्या गाडीसाठीही तुहा बाप





पैशाचा जुगाड करत नाई, हे तं लयच झाली मंग. आता या मंगयवारी जाजो तुह्या मायकडं आनू पैशे घेऊनच येजो."

रुक्मी विचारात पडली. तिचं लग्न होऊन पुरतं वर्षही झालं नव्हतं आणि नवरा मोटरसायकलसाठी माहेरून पैसे आणायला सांगत होता. त्याचीच 'री' सासराही ओढत होता. वास्तविक रुक्मिणीच्या लग्नासाठी तिच्या वडिलांनी खूपच खर्च केला होता. जावयानं मागितलेल्या सगळ्या वस्तू दिल्या होत्या. इवाह्याचा चांगला मानपान केला होता. स्वतःसाठी शेताचा लहानसा तुकडा ठेवून बरीचशी जमीन विकून कर्ज काढून त्यांनी आपल्या एकुलत्या एका लेकीचं लग्न थाटामाटात केलं होतं.

रुक्मीच्या सासरी तशी चारच माणसं. सासू, सासरा, नवरा आणि एक दीर. नणंद लग्न होऊन सासरी गेली होती. रुक्मीचा सासरा, नवरा आणि दीर सकाळीच न्याहारी करून शेतावर जायचे. स्वयंपाकपाणी, घरातले कामधाम आटोपून रुक्मी आणि तिची सासू शेतावर भाकरपाणी घेऊन जायच्या. तिथेच त्याही सायंकाळपर्यंत राबायच्या. संध्याकाळी सगळे एकत्र घरी यायचे. मग रुक्मी रात्रीच्या स्वयंपाकाला लागायची.

गावातल्या दोस्तानं फटफटी घेतलेली पाहिली आणि रुक्मीचा नवरा बापाकडून पैसे आण म्हणून बायकोच्या मागेच लागला. मागच्या वेळी रुक्मी माहेरी गेली तेव्हा तिने नवऱ्याची फटफटीची इच्छा वडिलांजवळ बोलून दाखवली; पण त्यांची आर्थिक स्थिती तिला दिसत होती. तिचा नवरा आता खूपच घाईस आला होता. तो तिच्याशी धड बोलेना. धमक्याही देत होता. म्हणून शेवटी नाइलाजानेच ती मंगळवारी आठ मैल अंतरावर असलेल्या तिच्या माहेरी गेली.

लेक आलेली पाहून आईवडिलांना खूप आनंद झाला. पण तिचा उतरलेला चेहरा पाहून त्यांना काळजी वाटू लागली.

आईनं मायेनं विचारल्यावर तिनं रडत रडतच मन मोकळं केलं. आपल्या एकुलत्या एका लेकीला सासरी त्रास होऊ नये म्हणून काहीतरी तडजोड केलीच पाहिजे, हे तिच्या वडिलांनाही जाणवलं.

दुसऱ्या दिवशी ते लेकीला म्हणाले, “रुक्मा, तू कायबी कायजी करू नोको. दोन-चार दिसांत मी पैशे घेऊनच येतो.”

रुक्मीच्या डोळ्यांत अश्रू उभे राहिले. मोठ्या जड अंतःकरणानं तिनं आईवडिलांचा निरोप घेतला.

रुक्मा घरी पोचली आणि नवऱ्यानं हटकलं, “कावं, आनले पैशे?”

“बावाजी म्हने का दोन-चार दिसांनी थ्येच घिऊन येते म्हून.”

“दोन-चार दिस? बाप्पा बाप्पा! ठीक आहे म्हना. इतले दिस गेले तं आन्खी दोन जातीन. पन माह्या लेकाले फटफटी भेटलीच पायजे.” सासऱ्यानं मध्येच तोंड मारलं. रुक्मी निमूटपणे आत जाऊन सासूला मदत करू लागली.

चार म्हणता म्हणता आठ-दहा दिवस होऊन गेले तरी रुक्मीच्या वडिलांचा पत्ता नव्हता. नवरा रोज तिच्यामागे भुणभूण लावीत होता. अद्वातद्वा बोलत होता. शेवटी महिना सरला आणि जणूकाही त्याची सहनशक्तीच संपली. त्याने आवाज चढवून बायकोला धमकी दिली, “हे पाय रुक्मे, आत्ताच्या आत्ता जाय तुह्या मायकडं आन् फटफटीचे पैशे घेऊन ये. रिकाम्या हाथानं वापस याचं काम नाही. आनि जर का पैशाचा जुगाड झाला न्हाई तं तथीच रायजो. माह्या घरात पाय ठेवाचं काम नाई.”

आता रुक्मी घाबरली. आत चूल पेटवून त्या धुरात आपले हुंदके लपविण्याचा ती केविलवाणा प्रयत्न करू लागली. दुपारच्या वेळी रुक्मी माहेरी पोचली. माय, बावाजी शेतात राबत





होते. आज नांगरणी सुरू होती. बावाजीचे दोन्ही पांढरे शुभ्र बैल - ढवळ्या आणि पवळ्या ऐटीत फिरत होते. तिला पाहताच हातचे काम टाकून तिचे आईबाबा जवळ आले. त्यांना पाहताच आतापर्यंत रोखून धरलेला रुक्मीचा हुंदका फुटलाच.

“काऊन वं, काय झालं पोरी?” बावाजी तिच्या पाठीवरून हात फिरवीत विचारू लागले.

“उगी, उगी पोरी, लडू नको बाई. काई दुखते का मां?” मायनं हळुवारपणे विचारलं.

बऱ्याच वेळानं रुक्मीचा उमाळा ओसरला. तिनं नवऱ्याचे सगळे बोल ऐकवले.

“हात्तीच्या, इतलंच ना?” बावाजीनं तिला धीर दिला, “आवं पोरी, तू कायबी कायजी करू नगंस. म्या उद्याच सकायवकाय पैशे घेऊन येतो तुह्या घरी. आजच म्या पैशाचा समदा बंदोबस करतो.”

वडिलांचे ते शब्द ऐकून रुक्मीला धीर आला. हायसं वाटलं. आशेची ज्योत तेवत ठेवून ती आपल्या सासरी परतली. बावाजी उद्या सकाळीच पैसे घेऊन येणार असल्याची माहिती तिने नवऱ्याला दिली.

“जर का तुहा बा उद्या पैशे घेऊन न्हाई आला, तं ह्या चुलीतल्या टेंभ्यानं तुही मरम्मत करीन पायजो.” नवऱ्याच्या ह्या भयंकर धमकीने रुक्मीच्या डोळ्यांतून आसवे टपकू लागली.

तिकडे रुक्मीच्या आईवडिलांचा रात्री डोळ्याला डोळा लागत नव्हता. किती सहजतेने त्यांनी आपल्या लेकीला पैशांची व्यवस्था करण्याचे आश्वासन दिले होते! रातोरात घडामोडी झाल्या. त्यांनी इतक्या कमी किमतीत ढवळ्याला विकले, याचे घेणाऱ्या पाटलांना आणि गावातल्या कास्तकारांनाही खूपच आश्चर्य वाटत होते. रुक्मीच्या आईची सोन्याची पोतही सावकाराला फारच स्वस्तात

मिळाली. तोही खूष झाला. पवळ्याच्या डोळ्यांतून अश्रूंची धार खंडता खंडत नव्हती; कारण त्याचा सोबती ढवळ्या आता त्याच्याबरोबर नव्हता. अत्यंत जड अंतःकरणानं रुक्मीच्या आईवडिलांना हा निर्णय घ्यावा लागला होता.

शब्द दिल्याप्रमाणे रुक्मीचे बावाजी सकाळीच व्याह्यांकडे पोचले.

"रामराम, जावईबापू." नम्रपणे हात जोडून ते बोलले.

"रामराम, आनले का पैशे?" जावयानं कुत्सित स्वरात प्रश्न केला.

"हौ जी. घ्या मोजून. पुरे ईस हजार हायेत."

"आत्ता? फकस्त ईस हजार? आन्खीन पाच हजार लागत होते ना? तरी तं म्या काई नवी फटफटी न्हाई घेऊन रायलो."

"जावईबापू, आताची घ्या बापा एवस्था करून. तुरी इकल्या का पाच हजाराचीही सोय लावून देतो."

"अजून तं वावराईत नांगरनंच सुरू हाय. तुमी पेरान कई? तुरी येतीन कई? आन विकान कई? हे काई जमलं नाई सासरेबुवा."

"मी पायतो ना, त्या आंधी काई जुगाड जमला तं आनून देतोच."

"घ्या बसून मंग. ज्येवन करूनच जाजा. लेकीले भेटून घ्या." असं म्हणून जावई वीस हजार रुपये घेऊन निघून गेला. रुक्मीच्या वडिलांनी व्याह्याला आणि विहिणीला रामराम केला. त्यांनीही रामराम म्हटलं, तेव्हा रुक्मीचा जीव भांड्यात पडला. रुक्मीनं लवकरच स्वयंपाक केला. जेवण करून तिचे बावाजी गावाकडे निघाले. जाताना वळून वळून पाहणारी त्यांची नजर लेकीच्या सुखाची झालर तिच्या चेहऱ्यावर उमटते का, याचा





शोध घेत होती. रुक्मी केवळ आपल्या अश्रूंना कसोशीनं आवरण्यापलीकडे काहीच करू शकत नव्हती. बावाजींनी पैशांची व्यवस्था कशी केली असेल, हा रुक्मीचा प्रश्न अनुत्तरीतच राहिला.

दुसऱ्याच दिवशी रुक्मीच्या नवऱ्यानं फटफटी आणली. आता तो खूपच खुषीत होता. मधूनमधून रुक्मीलाही तो डावडाव करून आणू लागला. तिचा सासराही आता फटफटीवर बसूनच शहरात जाऊ लागला.

असे आठेक दिवस होत नाहीत, तर फटफटीत काहीतरी मोठा बिघाड झाला. दुरुस्तीला दोन हजार रुपये लागणार असे कळताच रुक्मीच्या नवऱ्याने तिच्या बापाकडचे पाच हजार रुपये अजून आले नसल्याची आठवण करून दिली.

"कावो, तुहे बावाजी पाच हजाराची एवस्था करतो मने तं अजून व्हाचीच हाय? तू उद्याच सकायवकाय जाजो आन इचारजो बरं. नसंन जमलं तं दोन हजारतरी आताच द्या मनावं. फटफटी इचकली मना."

रुक्मीच्या छातीत धस्स झालं. आताच तर वडिलांनी वीस हजार रुपये कुठून आणि कसे जमवले माहीत नाही. आता पुन्हा त्यांना पैसे कोणत्या तोंडानं मागावे? पण नवऱ्याचा राग तिला माहीत होता. दुसऱ्या दिवशी खिन्न मनानं ती माहेरी पोचली.

समोरचे दृश्य बघून तिला धक्काच बसला. नकळत तिने टाहो फोडला, "बावाजी ऽऽऽ" आणि ती धावतच निघाली. बावाजी एका बाजूला आणि पवळ्या दुसऱ्या बाजूला असे दोघे मिळून वखर ओढत होते आणि माय वखरावर उभी होती. ते हृदयविदारक दृश्य पाहून रुक्मीच्या मनाच्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडाल्या.

पवळ्या थांबला. बावाजी थांबले. मायनं बावाजीच्या मानेवरचं जू दूर केलं. त्यांची मान रक्ताळली होती. रुक्मा

त्यांच्या छातीवर डोकं ठेवून धाय मोकलून रडू लागली. भीषण वास्तव पाहून ती स्वतःला सावरू शकली नाही. आपल्या नवऱ्याच्या अतिरेकीपणामुळं आपल्या आईवडिलांची काय अवस्था झाली आहे, ते तिनं प्रत्यक्ष पाहिलं. तिचा करुण स्वर आसमंत चिरून गेला. मायलाही हुंदका आवरला नाही. पवळ्याही दुःखातिरेकाने हंबरू लागला. बावाजी सगळ्यांना शांत होण्यास सांगू लागले. त्यांचेही डोळे अश्रूंनी डबडबले होते.

अचानक मनाशी काहीतरी निर्धार करून रुक्मी तडक चालू लागली.

"आवं पोरी, कुटं निगालीस?" बावाजी तिच्यामागे धावले.

"बावाजी, मी चाललो पोलीस ठेसनात. आता सिधा रिपोटच देतो माह्या मालकाचा."

"आता वो माय, आवो पोरी थांब." माय काळजीत पडली. "कायले रिपोट देतो पोरी? तुले तं त्या घरातच नांदाचं हाय."

"मले काई सांगू नोका. तुमाले माह्या नवऱ्याच्या फटफटीसाठी इतले कस्ट करा लागून रायले आन् म्या गप राऊ? मायबापाकडनं पैशे आनले नाई तं नांदोनार नाई, अशा धमक्या मले देते असा रिपोट देतो लिवून."

"आवो पोरी, असा इपरीत इचार करू नगंस. कायबी झालं तरी तो तुहा मालक हाय. त्यानं हाकलून देल्लं तं जाशीन कुठं? हिथं रायशीन तं लोक श्यान घालतीन आमच्या तोंडात. अजून तं तुह्या लगनाले पुरतं एक सालबी झालं नाई पोरी. जरा धिरानं घे. जावईबापूचा जवानीचा ज्योष हाय. उद्या पोरंसोरं झाली का मंग तेबी समजुतीनं घेतीन. आपली पडती बाजू हाय पोरी. नमतं घ्याच लागते. पोरीच्या जातीनं सासरचा मान ठेवाच





लागते. उद्या त्याइनं तुले नांदोलं नाई तं आमच्या जिवालेच घोर लागंन. म्या करतो पैशाची सोय. पोलीस ठेसनाची झंझट काऊन आनतं घरात? तू आता फिकर करू नोको. समदं येवस्थित होते. लागंन तं म्या पाय धरतो इव्हायाचे. जावयाचेपन धरतो. पन तू सुखानं राय पोरी त्या घरात."

बावाजींचे बोलणे ऐकून रुक्मीचा धीर पुन्हा सुटला. ती ओक्साबोक्शी रडू लागली. मायला तिचे जुने दिवस आठवले. तीही अशाच आवर्तातून गेली होती. त्यावेळी तिला युक्ती सुचविणारी तिची मावशी होती. तीच युक्ती आपल्या पोरीच्याही मदतीला येईल, अशी तिला खात्री वाटली.

"उगी पोरी, उगी राहा. लडू नोको. मी तुले एक मंतर देतो. थ्योच तुले या संकटातून पार पाडीन." असे म्हणून रुक्मीच्या आईने तिच्या कानात हळूच काहीतरी सांगितलं. ते ऐकून रुक्मी फारच लाजली. रुक्मीच्या बावाजीलाही तो मंत्र माहीत होता. तेही पत्नीकडे बघत गालातल्या गालात हसले.

दुसऱ्या दिवशी रुक्मीचे बावाजी तिच्या सासरी एकटेच गेले.

"आँ? सासरेबुवा, तुमी येकटेच? आनले का पैशे? आन् रुक्मी कुटं हाय?"

"थ्ये नाई आली. तिची तब्येत इचकली."

"आत्ता? मंग डागतरकडं नाय नेल्लं?"

"नेल्तं. डागतरीननं सागतलं का आठ-पंधरा रोज तिले आराम करा लागंन. अथीच राऊ द्या. नवऱ्याच्या घरी काम करा लागंन तं इपरीत हुईन. तिले धाडू नोका. रोज तपासा लागंन."

"हे तं भलकसंच झालं. पन बिमारी तरी काय हाय म्हनाची?"

इतक्यात माजघरातून ऐकणाऱ्या रुक्मीच्या सासूनं मुलाला आणि त्याच्या बापाला आत बोलवलं. लगेच हसत हसत जावईबापू बाहेर आले.

"अस्सं होय तं मंग. तिनं तं आमाले सांगतलंच नाई वो काई? तशी पुरुषमान्सायच्या तोंडची गोठ न्हाई मना ही. असू द्या. राहू द्या तिले आराम कराले. मी येतोच तिची खबरबात घ्याले. पन चांगली कायजी घेजा सासरेबुवा."

"जावईबापू, आमी तिचे जनमदाते हाओत. आमाले का फिकर न्हाई राहनार? पंधराक दिसानं यान ना तिले न्याला पन?"

"हौनाजी. आन् तुमी पैशाची फिकर करू नोका. आता मले नाई लागत काई पैशेवैशे. आता माह्या घरात येईन लक्षुमी नाय तर वंशाचा दिवा."

पंधराच्या ऐवजी आठच दिवसांनी रुक्मी आपल्या पतीबरोबर अगदी खुषीत घरी आली. सगळेच तिला फुलाप्रमाणे जपू लागले. खुषीखुषीत दोघांची मनं जुळली आणि खरंच रुक्मीला दिवस गेले. आतापर्यंतचं नाटक वास्तवात उतरलं. यथावकाश रुक्मीला मुलगीच झाली.

"काजी? मले पोरगी झाली मून तुमी नाराज तं नाई झाले?"

"नाईवो, थे तं आपल्या घरची लक्षुमी व्हय. म्या आता बाप झालो, हेच मले सुख होय."

"पन काजी, हिचं लगन केल्यावर जावयानं फटफटीले पैशे मांगतले तं वो?"

"काऊनवो भलत्या वक्ती भलत्या गोस्टी करतं? येवढा आनंदाचा दिस आन् तुले थ्येच आठवते न्हाई?"

"पन तुमी तं मले हाकलून देल्तं जी."





"राऊ दे ना वो आता. तवा चुकलं माहं. कबूल हाय. बह्याड कुत्रं डसलं होतं मले. आता म्या नाय मांगनार येक पै तुह्या बावाजीकडं. मंग तं झालं?"

"हौ, माईतच हाय मले. आता काहून मांगान तुमी? लक्षुमी नाई आली तुमच्या घरात?"

"व्हय तर मंग. आता ह्येच माही लक्षुमी व्हय. आपून लय शिकवू हिले आन् मोठ्ठी करू. शिकशीन ना वो लक्षुमे?"

पतीपत्नीचा प्रेमालाप सुरू होता. मुलीच्या गालावर गोड खळी उमटली होती. बाहेर दरवाजाजवळ उभ्या रुक्मीच्या बावाजीनं त्यांचं बोलणं ऐकलं. आयुष्याचं सार्थक झाल्याच्या समाधानात शेल्यानं डोळ्यांच्या ओलावलेल्या कडा पुसल्या आणि शेताची वाट धरली.


पूर्वप्रसिद्धी :

१. 'बहर', २९ वे राज्यस्तरीय अंकुर साहित्य संमेलन (यवतमाळ) विशेषांक २००१

२. 'साहित्य मैफील' दै. हिंदुस्थान, अमरावती, रविवार, दि. २३ जून, २००२

आकाशवाणी प्रथम प्रसारण :

आकाशवाणी यवतमाळ, शुक्रवार, दि. २ नोव्हेंबर, २००१



# काळूराम

काळूराम मला त्याचा मित्रच मानतो; पण मी मात्र त्याला मित्र मानून घ्यायला नेहमीच संकोचतो. त्याचं कारणही तसंच आहे. मी ज्या क्षेत्रात एक प्रतिष्ठित सभ्य गृहस्थ म्हणून वावरतो, ते क्षेत्र किंवा त्या समाजातील माणसं काळूरामला 'कुख्यात गुन्हेगार' म्हणून ओळखतात. असे असूनही काळूराम मला आवडतो. त्याच्याशी बोलायला मला आवडतं. अर्थात आजूबाजूला परिचितांपैकी कुणी नाही याची खात्री करून घेतल्यावरच मी त्याच्याशी बोलतो. एरवी मात्र ओळखही दाखवत नाही.

प्रत्येक भेटीत तो मला काहीतरी नवीन माहिती पुरवत असतो; त्यामुळे माझ्या विचारचक्राला चालना मिळते. प्रवासात





- विशेषतः एस.टी.च्या प्रवासात - काळूराम दिसला तरी तो माझ्याशी बोलत नाही किंवा माझ्याकडे ढुंकूनही पाहत नाही. कारण ती त्याच्या 'धंद्याची जागा' असते आणि तो त्याचा 'धंद्याचा टायम' असतो. बघता बघता त्याच्या शेजारच्या माणसाच्या खिशातला माल काळूरामच्या खिशात अगदी शिताफीने पोचतो. पुढच्या बसस्थानकानंतर काळूराम बसमध्ये नसतो. दुसऱ्या एखाद्या बसने तो वेगळ्याच मार्गावर रवाना झालेला असतो. बसमध्ये बाजूला स्त्रीप्रवासी असेल तर एखाद्या सभ्य गृहस्थाप्रमाणे तिच्या शरीराला स्पर्शही न करता तिच्या नकळत अगदी सहजतेने तिच्या पर्समधील ऐवज, मौल्यवान चीजवस्तू काळूराम लंपास करतो.

फक्त बसप्रवासातच काळूरामचा धंदा चालतो असं नाही, तर विविध बसस्थानके, खेड्यातील बाजार, सिनेमा थिएटर्स, एखादे गर्दीचे दुकान किंवा विविध मेळावे अशा कुठल्याही जागी काळूरामची चलती असते. वेगवेगळ्या मार्गाने अनेक चोऱ्या करणाऱ्या काळूरामला ड्युटीवर असलेले पोलीस मात्र कधी पकडत नाहीत, याचे मला सदोदित आश्चर्य वाटते.

कधीतरी एकदा काळूराम मला म्हणाला होता, "त्याचं काय गुर्जी, आपली ओळख गल्लीपासून दिल्लीपर्यंत. गल्लीतल्या पोलिसानं पकडलं तर दिल्लीच्या पोलिसांकडून एका फोनवर सुटका होते आमची."

"ते कसं काय?"

"तुम्हाला माहीत नसेल गुर्जी, गल्लीतले पोलीस पकडतात ते थोडाफार हप्ता खाण्यासाठी."

"गल्लीतले पोलीस?"

"म्हणजे आपल्या गावातले हवालदार हो."

"मग दिल्लीतले पोलीस म्हणजे?" माझा आपला भाबडा प्रश्न.

"काय गुर्जी, दिल्लीतले पोलीस म्हणजे जरा वरच्या पोस्टवरचे सबइन्स्पेक्टर, इन्स्पेक्टर, शहरातले ऑफीसरवगैरे. आपली ओळख अगदी वरपर्यंत आहे गुर्जी. जशी तुमच्याशी तशीच त्यांच्याशी." काळूरामच्या शेवटच्या वाक्याने मी हादरलोच.

"मला एकदा शहरातल्या सबइन्स्पेक्टरनं पकडलं तेव्हा तुमचंच नाव सांगितलं आणि सुटलो त्याच्या तावडीतून." मला आणखी एक दणका.

"माझं नाव सांगून सुटका?"

"खरंच सांगतो गुर्जी, मी त्याला म्हटलं, हे पाहा पोलीसदादा, तुम्ही आमच्या गुर्जींना ओळखता ना? त्यांनी मनात आणलं तर तुमच्या भ्रष्टाचाराच्या जन्मसिद्ध हक्कावर त्यांच्या लेखणीतून गदा यायला वेळ लागणार नाही, हे लक्षात ठेवा."

मी कपाळावर हात मारून घेतला.

याची टोपी त्याला, त्याची याला असा कारभार करणाऱ्या काळूरामने पोलीस आयुक्तांच्या मोबाईलपासून बहुतेक पोलीस अधिकाऱ्यांचे आणि पोलीसठाण्याचे दूरध्वनी क्रमांक आपल्या डायरीत टिपून घेतले आहेत. कोणता पी.एस.आय. कोणाचा दोस्त, कोणाची वर्णी कुठे लावायची या संदर्भातील काळूरामचे संशोधन त्याला पाकीटमारीचा धंदा बिनधास्तपणे करू देते.

त्या दिवशी शहरातील एका चित्रपटगृहासमोर काळूराम दिसला. मला बघताच अगदी खुषीत येऊन त्याने मला शेकहँड केला.

"रामराम गुर्जी."

"रामराम." मी भीतभीत, हळूच इकडेतिकडे बघत माझा हात सोडवून घेतला. त्यावर काळूराम खळखळून हसला.

"घाबरू नका गुर्जी, हा काही आपल्या धंद्याचा एरिया नाही. इथे आपला धंदा जमत नाही. इथली थिएटर्स वाटलेली





असतात. ठरावीक धंदेवालाच इथे काम करील. या पॉकेटमारीच्या धंद्याचा एक बॉस असतो. तो सगळ्यांना एरिया वाटून देतो. दुसऱ्याच्या एरियात धंदा करणाऱ्याला बॉस दंड करतो, मारपीट करतो, हाकलून देतो. या धंद्यात बेइमानी बिल्कूल चालत नाही, गुर्जी."

"तर मग कुणाचं पाकीट किंवा चीजवस्तू चोरीला गेली तर तुमच्या बॉसला ते लगेच कळत असेल, कोणी चोरली ते."

"अहो, नुसतं बॉसलाच काय, पोलिसांनाही माहीत असतंच की!"

"पोलिसांनापण?" मला आश्चर्यच वाटलं.

"हो, कारण पोलिसांच्या आशीर्वादाशिवाय हा धंदा कुणालाच करता येत नाही. बॉस पोलिसांना कमिशन देतो. त्यामुळे बॉसच्या परवानगीशिवाय कोणताच पोलीस माहीत असले तरी चोराला पकडत नाही. चोर चोरलेला सगळा माल बॉसच्या स्वाधीन करतो. त्यातून ठरलेली रक्कम फक्त चोराला मिळते. पोलिसाला त्याचा वाटा मिळतो."

काळूराम बोलत होता, तोच सिनेमाची वेळ झाली. काळूरामजवळ बाल्कनीचे तिकीट होते. मला वाटलं होतं, तो बिनातिकीट सिनेमा बघणार. मी आपलं तिकीट काढण्यासाठी खिशात हात घातला तर त्यात पाकीटच नव्हतं. म्हणजे एवढ्या वेळात कुणीतरी मला हात दाखवला होता. मी सर्व खिसे तपासले, पण व्यर्थ. मी हळूच काळूरामला माझे पाकीट मारलं गेल्याचं सांगितलं.

"घाबरू नका गुर्जी, आधी सिनेमा पाहून घेऊ आणि मग तुमचे पाकीट आणायला जाऊ." तो हसत हसत बोलला. माझं बाल्कनीचं तिकीट त्याने काढलं आणि आम्ही सिनेमा बघायला

बसलो. मी काळूरामकडेच संशयी दृष्टीने पाहत होतो.

संपूर्ण सिनेमा संपेपर्यंत काळूराम जागचा उठला नाही. तो सिनेमात चांगलाच रंगला होता. माझं मात्र क्षणभरही सिनेमात लक्ष लागलं नाही.

सिनेमा संपल्यावर आम्ही थिएटरबाहेर आलो. काळूरामने रिक्षा ठरवली. तीत बसून आम्ही कुठल्यातरी झोपडपट्टीत आलो. एका मोठ्याशा झोपडीपुढे रिक्षा थांबली. आम्ही उतरलो. रिक्षावाला पैसे घेऊन निघून गेला. मला तिथेच थांबवून काळूराम त्या झोपडीत गेला. मला आतील बोलणे ऐकू आले.

“अस्सलाम आलेकुम सलीमभाई.”

“वालेकुम सलाम काळूराम. बोलो क्या बात है?”

“सलीमभाई, हमारे गुर्जीका पाकीट मारा गया है चित्रा टॉकीजपे.”

“तो क्या, वापस चाहिये?”

“हां सलीमभाई, अपने इज्जत का सवाल है.”

“कितना माल था?”

काळूराम बाहेर आला. पाकीटात चारशे रुपये असल्याचे मी सांगितले. तो परत आत गेला.

“चारसौ थे सलीमभाई.”

“तो फिर सौ में निपटा लो.”

“ठीक है, सलीमभाई.”

सलीमभाईने मोबाईल फिरवला. त्यात काहीतरी संभाषण झाले. पाचच मिनिटांत कुणीतरी माणूस सायकलवर तिथे आला. त्याने माझे पाकीट सलीमभाईजवळ दिले. सलीमभाईने त्यातले शंभर रुपये काढून घेतले. त्यापैकी पन्नास रुपये लगेच त्या सायकलवाल्या पाकीट आणणाऱ्याला दिले व बाकीचे पन्नास स्वतःच्या खिशात ठेवले. उर्वरित पैशासह माझं पाकीट मला





मिळालं. ह्या विचित्र व्यवसायाबद्दल विचार करीत मी काळूरामसोबत घराकडे परतलो.

काळूराम रंगानं काळा नाहीच. त्याचं मनही काळं नाही. मग त्याचं नाव काळूराम का पडलं असावं, हे कोडं मला बरेच दिवस उलगडत नव्हतं. शेवटी एक दिवस मी त्याला या बाबतीत छेडलंच. तो म्हणाला, “त्याचं काय गुर्जी, मी प्रभू श्रीरामचंद्रांसारखा (?) दिसतो म्हणून आईनं कौतुकानं माझं नाव राम ठेवलं. पण नवस बोललेल्या माझ्या आजीला माझं नाव काळूच ठेवणं भाग होतं. माझ्या बापानं यातून तोडगा काढला आणि माझं नाव काळूराम पडलं.”

काळूराम एवढं शिताफीनं पाकीट कसं मारतो, हेही माझ्या मनाला पडलेलं कोडं होतं. मी भर बाजारात किंवा देवळाच्या गर्दीत त्याच्यावर लक्ष ठेवून असायचो; पण तो केव्हा हात साफ करायचा ते मला कळायचंच नाही.

रोज रात्री काळूराम विदेशी दारूची बाटली पोटात रिचवतो आणि मग कधीमधी त्याची बडबड सुरू होते. तो भारतीय संस्कृतीची प्रशंसा करतो. शहरातल्या तोकडे कपडे घालून अंगप्रदर्शन करणाऱ्या तरुणींना, नट्टापट्टा करून पुरुषांचे लक्ष आकर्षित करणाऱ्या बायांना तो खूप शिव्या घालतो.आत्यंतिक गरिबीमुळे फाटक्यातुटक्या कपड्यातही अंग झाकण्याचा प्रयत्न करणाऱ्या मुलींबद्दल तो कधीच वावगं बोलत नाही. उलट त्यांना जमेल तशी मदत करतो. शहरातली गुंडागर्दी त्याला पसंत नसते. गावातल्या माणुसकीच्या जिव्हाळ्याबाबत तो खूप आत्मीयतेनं बोलतो. टी.व्ही. किंवा सिनेमातून होणाऱ्या अनैतिकतेचे प्रदर्शन त्याला मुळीच आवडत नाही. त्यावर तो सडकून टीका करतो. पण हे सगळं फक्त त्या विदेशीचा अम्मल त्याच्यावर असेपर्यंतच. सकाळ होताच तो आपल्या धंद्याला लागतो.

एक दिवस मात्र विदेशी दारूच्या धुंदीत नसतानाही त्याने मला त्याच्या धंद्यातील हातसफाईच्या कामगिरीबद्दल बरंच काही सांगितलं. अगदी पूर्ण शुद्धीत असताना.

“त्याचं काय गुर्जी, शहरात पाकीट मारायची पद्धत वेगळी आणि गावात वेगळी. शहरात हे काम करायला एक-दोन साथीदार असावे लागतात. आपण सावजाचा पाठलाग करीत असताना आपल्या साथीदारानं सायकलवर बसून समोरून यायचं आणि त्याच्या दोन पायात सायकल घालून त्याला पाडायचं. आपण सायकलवाल्याला शिव्या देत देत सावजाला उठवायचं आणि त्याच वेळी त्याचा खिसा साफ करायचा. समजा सावजानं पडण्याआधीच आपल्या दोस्ताची सायकल पकडली तर दोस्ताला दोन-चार शिव्या, एखादा रट्टा हाणायचा आणि त्या दोघांत बाचाबाची सुरू झाली की अलगद पाकीट मारून सटकायचं. मागून आपला साथीदार येतोच.

एखाद्या सिनेमा टॉकीजवर तिकीट काढताना साथीदारानं आपल्या सावजाच्या पुढे रांगेत न लागताच घुसायचं. त्यांची वादावादी सुरू होताच आपण मागून सावजाचा खिसा कापायचा.

कधी सुनसान रस्त्यावर सावजाच्या अंगावर घाण टाकायची व ती साफ करण्याच्या नादात असलेल्या सावजाचा माल लंपास करायचा. कधी एखाद्याच्या सायकलच्या चाकात किंवा चेनमध्ये सुतळी अडकवायची आणि ती तो काढण्याच्या प्रयत्नात दिसला की पाकीट, बॅग वगैरे गायब करायची.

आपण बसमध्ये बसलो की साहजिकच शेजारच्या माणसाचा खिसा चाचपडणे फारसे कठीण जात नाही. गर्दीमुळे उभ्याने प्रवास करणाऱ्यांचे हात वर बार पकडण्यात, पिशवी सांभाळण्यात गुंतलेले असतात. मग त्याच्या खिशावर अलगद





डल्ला मारता येतो. बसमध्ये गर्दी असली की धंदा करणं सोपं जातं. लेडीजच्या पर्सची झिप त्यांच्या नकळत उघडून आतला माल सहज उडवता येतो. कारण खिडकीजवळ बसलेल्या बहुतेक बाया किंवा पुरुष खिडकीबाहेरची मजा बघण्यात गुंतलेले असतात.

आता गुर्जी, सांगूनच टाकतो त्या दिवशीची सगळी कथा. चित्रा टॉकीजवर तुमचं पाकीट मारताना मी त्याला पाहिलं होतं.”

“अरे काळूराम, मग तिथेच का नाही सांगितलंस तू मला? आणि लगेच का नाही पकडला त्या चोराला?” मी विचारलं.

“त्याचं काय गुर्जी, तसं करणं म्हणजे आपल्या धंद्याशी बेइमानी करणं ठरलं असतं. मी त्याला तिथे पकडलं असतं, तर सलीमभाईने आपला धंदाच बंद करून टाकला असता. मग आम्ही आमचं पोट कसं भरायचं? म्हणून मी समन्वय साधला. तुमचे पैसेही मिळवून दिले आणि सलीमभाईचा मानही राखला. आता तुमचे शंभर रुपये कमी झाले; पण सगळेच पैसे गेले असते तर?” काळूरामच्या ह्या असल्या तत्त्वज्ञानापुढे माझी मतीच कुंठीत झाली. मी गप्प.

परवाच्या प्रसंगाने मात्र मला अट्टल गुन्हेगार काळूराममधलाही माणूस बघायला मिळाला. बाजारात चार-पाच पाकीटं मारून काळूराम घराकडे परतत होता. त्याचवेळी एका गरीब दलित मजुराचं रडगाणं त्याच्या कानी पडलं. त्या दरिद्री बापाला तीन तरण्याताठ्या पोरी. उधारी-उसनवारी करून त्यानं एकीचं लग्न जमवलं; पण हजार रुपयांसाठी नवरदेवानं लग्न मोडायची तयारी केली. काळूरामनं ताबडतोब स्वतःजवळ जमलेली सगळी रक्कम त्या बापाला दिली आणि नवरदेवालाही समज दिली. लग्न आनंदात पार पडलं पाहिजे, मी लग्नाला येईन, असं सांगून काळूराम कसलीही अपेक्षा न ठेवता तिथून निघून गेला.

शिक्षण घेऊन स्वतःला शहाणे समजणाऱ्या पैसेवाल्या दलितेतरांतही जातिभेदाच्या भिंती तोडून अशी मदत करण्याची सदिच्छा आढळत नाही, तिथे काळूरामसारखा खिसेकापू निरपेक्षपणे आपली पुंजी देऊन समाजातील आर्थिक आणि जातीय विषमतेची दरी बुजवण्याचा प्रयत्न करतो, हे माणुसकीचं दर्शन नाही तर काय?

खिसेकापूचा धंदा करणारा म्हणून काळूरामला ‘खिसेकापू’ म्हणायचे; पण वकील, डॉक्टर, पोलीस, शासकीय अधिकारी हे सुद्धा सामान्य जनतेला लुटणारे खिसेकापूच; पण उच्चभ्रू समाजात वावरणारे, साळसूदाचा पेहराव करणारे आणि मानसन्मानाने जगणारे म्हणून त्यांना ‘साहेब’ म्हणायचे. त्यांचा मान राखायचा. असला कोणताही मुखवटा धारण न करता पेशा म्हणून काम करणारा काळूराम आहे त्याच रूपात समाजासमोर येतो. गरिबांची कदर करतो. एखाद्या प्रसंगी मन द्रवलं तर बड्याबड्यांच्या दिखाऊपणापेक्षा अस्सल समाजसेवा करतो. कोणी आपला ‘उदो उदो’ करावा अशी अपेक्षाही ठेवत नाही. प्रसिद्धीचा त्याला सोस नाही. असा हा काळूराम गुन्हेगारातला माणूस आहे.

या क्षणी मात्र मी सुन्न झालो आहे. चोरीच्या गुन्ह्याखाली पोलीस त्याला पकडून नेत आहेत. कदाचित त्या पोलिसांचा हप्ता काळूरामने अथवा सलीमभाईने दिला नसेल किंवा कुणी नवा पी.एस.आय. बदलून आला असेल. उद्या कदाचित काळूराम सुटून येईल; पण तोपर्यंत त्याच्या शरीरावर दंडुक्याचे काळेनिळे वळ उठलेले असतील. जनावराला बेदरकारपणे मारावं तसा पोलिसांचा खाक्या असतो. त्याच्यातल्या माणुसकीच्या मनावर हे निर्घृण घाव खोलवर जखमा करतील. तरीही काळूराम खिसे कापणं सोडणार नाही.

काळूराम एकटा आहे. त्यानं लग्न केलेलं नाही.





‘एकला चालो रे’चं जीवन तो जगतोय. पण हे असं किती दिवस चालणार? उद्या वयोमानानं शरीर थकलं, काळूराम आजारी किंवा त्याचा धंदा ठप्प झाला तर तो जगणार कसा? पोलिसांना ओरडून सांगावंसं वाटतंय की सोडून द्या काळूरामला. तो सामान्यांना, गरिबांना लुटत नाही. तो खरा समाजसेवक आहे. दीन-दलितांची, दरिद्री लोकांची फसवणूक करून त्यांना लुटणाऱ्या बड्या उद्योजकांचेच खिसे तो कापतो; पण तेवढीच गरजवंतांची सेवा करतो. त्याला सोडा हो.

पण माझ्यातल्या तथाकथित पांढरपेशा माणसाच्या तोंडून शब्दही फुटत नाही. त्या ठिकाणी मी माझा खरा परिचय देऊच शकत नाही. आतल्याआत मूकपणे आक्रंदत काळूरामच्या पाठीवर पडणारे तडाखे अगतिकपणे पाहत मी तिथून काढता पाय घेतो.

पूर्वप्रसिद्धी :

१. ‘अंतरंग’, पुसद, दीपावली विशेषांक २००१

२. ‘रंजन’, दै. नवराष्ट्र, नागपूर, रविवार, दि. ११ नोव्हेंबर, २००१

३. ‘एकता’,पुणे, दीपावली विशेषांक २००३



# नाम्या

"नाम्या, इकडं दोन किलो जवारी आनू छटाकभर खाचा सोडा देजो गिराइकाले."

"हौ मालक."

"आनू काबे, तुही ते डीयडची यंटरू कवा हाय?"

"तेराला आहे मालक."

"कठीसा बे?"

"औरंगाबादला मालक."

"अबे, तं बांध ना पुड्या लौकर, का गोस्टीच करत रायशीन? तू गेल्यावर मले दुसरं पोट्टं पाहाच लागंन कामाले. बरं, का बे, बंदोबस झाला का जाचा?"





"अजून तर झाला नाही मालक; पण होईलच काहीतरी जुगाड."

"नाई झाला तं सांगजो."

"हौ मालक."

"हे सरकार ची बहीन लयच गयंगुजरं हाय. चांगलं चालू व्हतं, तं टांग आडोली गरिबाले. आता डीयडच्या यंटरूले पाचशे मैलावर जावं लागते. काहून हो भाऊ असं?"

"ते काय गणपतराव, नवं सरकार, नवे नियम. आता डी.एड.ची प्रवेशप्रक्रिया केंद्रिय पद्धतीने होत असल्याने संपूर्ण महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना एकाच ठिकाणी जावं लागेल."

"पन मी म्हन्तो, गरिबानं काय करावं? कुठनं आनावे फीचे पैशे? यंटरूले औरंगाबादले जाचे, राहाचे, खाचे पैशे कुठनं येतीन?"

"अहो गणपतराव, गरिबांसाठी शिक्षणाची द्वारं बंद होऊन काळ लोटला. अंधेर नगरी बेबंद राजा अशी गत आहे सर्वत्र. घ्या पैसे, मी निघतो."

"हौ भाऊ."

अनाथ नाम्या मालकाचा आणि गिऱ्हाइकाचा संवाद निर्विकार ऐकत होता. खपाटलेल्या पोटातून चर्चेसाठी उद्‌गार काढण्याचं त्राणच शिल्लक नव्हतं. बालपणीच आईवडिलांचं छत्र हरपलं. मोडक्या-गळक्या घरात दिवस कंठले. शेजारच्या किराणा दुकानदारानं शेजारधर्माला जागून नाम्याला दुकानात कामाला ठेवलं. सकाळी शिक्षण घ्यायचं आणि दुपारपासून रात्रीपर्यंत दुकानात पुड्या बांधायच्या. रात्री थकलेल्या जीवानं घरी जाऊन दोन भाकऱ्या थापायच्या, चटणीसोबत खायच्या आणि मग अभ्यासाला बसायचं. झोपायचं किती, याचा नियमच नाही. सकाळी पुन्हा शाळा.

नाम्या मुळातच हुशार. शाळेत पहिल्या दहांत असायचा. बारावीला सत्तर टक्क्यांनी उत्तीर्ण झाला आणि नाम्यापेक्षा जास्त त्याच्या मालकाच्या आनंदाला पारावार उरला नाही. निकालानंतर येणाऱ्या प्रत्येक गिऱ्हाइकाच्या हातावर तब्बल आठवडाभर साखरेची चिमूट ठेवताना गणपतराव अभिमानानं सांगायचे, “भौ, आमचा नाम्या फश्टकलासमधे पास झाला. गरिबाघरचं लेकरू; पन लय हुश्यार. आपल्याच दुकानात लायन्याचा मोटा झाला. गिऱ्हाईक नसलं तवा तवा ह्या कोन्यात बसून अभ्यास करत व्हता.”

गिऱ्हाईक नाम्याकडं कौतुकानं पाहायचे. नाम्याच्या चेहऱ्यावर कुठलेच भाव नसायचे. भूक ‘मी’ म्हणत असायची. केव्हा दुपार होते आणि मालक आपल्या शिदोरीतील थोडीशी भाकर देतात, याकडे त्याचे डोळे लागलेले असायचे.

इ.बी.सी. सवलतीवर शिकलेल्या नाम्याने डी.एड. चा फॉर्मतर भरला; पण प्रवेशप्रक्रियेसाठी औरंगाबादला जाण्याचा बंदोबस्त कसा होईल, या काळजीने तो अधिक निराश झाला होता.

निघण्याचा दिवस उजाडला. मोटारस्टँडवर नाम्या लोखंडी पेटी घेऊन उभा होता. सोबत जोशी मास्तर, गणपतराव आणि नाम्याचे दोन दोस्त त्याला सोडायला आले होते. जोशी मास्तरांनी केलेल्या मदतीच्या ओझ्याखाली नाम्या वाकतच चालला होता. औरंगाबादला जाण्यायेण्याच्या तिकिटाचे पैसे त्यांनीच दिले होते.

एस.टी. आली. नाम्या चढला. चढता चढता गणपतरावांनी नाम्याच्या हातावर पन्नास रुपयांची नोट ठेवली.

“हे काय मालक?”

“अबे, ठीव ना लेका, कामी पडंन. आनू मी काय





तुह्या पगारातनं कापून घीन. मंग तं झालं? जाय आता.”

एस.टी. सुरू झाली. सर्वांचे हलणारे हात नाम्याच्या डोळ्यांतील अश्रूंनी पुसट करून टाकले. अंधार पडला होता. एवढा वेळ थोपवून धरलेले नाम्याचे हुंदके गाडीच्या आवाजात मिसळून गेले.

सकाळी औरंगाबाद आलं. त्याला आता ‘संभाजीनगर’ म्हणतात, हे नाम्याला समजलं. पण नाव बदलल्याने मानवी प्रवृत्ती बदलतात, यावर नाम्याचा विश्वास नव्हता.

प्रवेशप्रक्रिया सुरू झाली. उपाशी नाम्या आपला क्रमांक केव्हा लागतो, याची वाट बघत होता. कुणीतरी एकजण आला. शंभर रुपयांत लगेच नंबर लावून देतो, म्हणून सांगून गेला. नाम्याला अशा गोष्टींचा विचार करणेही शक्य नव्हते.

दिवस ढळला. नंबर लागला नाही. नाम्यानं पेटी उचलली. मोटारस्टँड गाठलं. खाणावळीत स्वस्तात स्वस्त राइसप्लेट घेतली. पोटाचा कुठलातरी कप्पा भरला. स्टँडवरील थंडगार बाकड्यावर अंग टाकलं. मम्मी-पपांच्या आलिशान वातानुकुलित मोटर कारमधून प्रवेशप्रक्रियेसाठी आलेली बाळं पंचतारांकित हॉटेल्समध्ये मऊ मऊ फोमच्या गाद्यांवर झोपी गेली असतील, असा विचार नाम्या करीत असतानाच पोलिसानं दंडुका आपटला.

“चल ए ऊठ. ही काय झोपायची जागा वाटली तुला?”

नाम्या निमूट उठला. पेटी उचलली. खाणावळीच्या मालकानं पाहिलं.

“ए पोरा, इकडं ये की.”

आशाळभूत नजरेनं नाम्या चालू लागला.

“हे बघ, ही भांडी घासून दे आनू झोप इथेच खाणावळीत.”

नाम्याला आधार वाटला. भांड्यांचा ढिगारा घासून त्याने जमिनीवरच तण्णावून दिली. थंडीच्या प्रकोपात भट्टीच्या बाजूला मिळालेल्या ऊबेनं नाम्याला गाढ झोप लागली.

दुसऱ्या दिवशी पोटात काहीतरी घालणं गरजेचं होतं. नाम्यानं खाणावळीतच पेटी ठेवली. स्टँडवर कुणी हमाली देईल का, याचा शोध तो घेऊ लागला. नेहमीच्या गणवेशधारी हमालांव्यतिरिक्त इतरांना हमाली कशी मिळणार? शिवाय तिथल्या हमालांच्या नकळत त्याला हमाली मिळवायची होती.

एक वृद्ध स्त्री नागपूर-औरंगाबाद बसमधून उतरली. नाम्यानं धावत जाऊन तिची सुटकेस आणि पिशवी घेतली. रिक्षापर्यंत पोचवली. बारक्या नाम्याकडं बाई कौतुकानं बघत होती. रिक्षात सामान ठेवलं. बाईने नाम्याच्या डोक्यावरून प्रेमळपणे हात फिरवला.

"लेकरा, किती रे पैसे देऊ?"

नाम्यानं खोलवर गेलेल्या त्या म्हाताऱ्या बाईच्या डोळ्यांत बघितलं. त्याला बालपणी सोडून गेलेली त्याची आई दिसू लागली. डोळ्यांत पाणी आलं. त्याने पाठ फिरवली. हुंदका दाबून झपाझप पावलं टाकीत निघून गेला. बाई हातात पैसे घेऊन 'अरे पोरा, अरे पोरा' म्हणत राहिली. नाम्यानं मागे वळूनही बघितलं नाही.

प्रवेशप्रक्रिया संपली. नाम्या रात्रीच्या एस.टी.ने परत निघाला. एस.टी. सकाळी थोडी उशीराच पोचली. पोचताच नाम्या मालकाकडे गेला.

"आला काबे नाम्या? झाला का यंटरू?"

"हौ मालक."

"मंग लागला का नंबर?"

"नंतर पत्र येईल मालक."





"बरं ज्येवला होता काल?"

नामा गप्प.

"मालूम हाय लेका, तू तसाच रायशीन. जाय दत्ताच्या देवळात माहाप्रसाद हाय."

नाम्याचे डोळे चकाकले. दत्ताच्या देवळात पोचला. मूर्तीला रामराम ठोकला. रांगेत लागून पत्रावळीवर मिळालेला महाप्रसाद आधाशासारखा खाऊ लागला.

महिना सरला. पत्र आलं. नाम्याचे डोळे पाणावले.

"काऊन बे, कठी लागला नंबर?"

"कोल्हापूरला."

"कोल्हापूरऽऽ बाप रे बाप! कसं बे? त्यायले मालूम नवतं का तू इकडं रायतो तं?"

"मालक, आपल्या पसंतीच्या ठिकाणी जागा नसली तर कुठेही पाठवतात."

"बरं जाऊ दे. नंबर तं लागला ना? तू शिक लेका, लय शिक आनू मास्तर हो. जोशी मास्तरासारखं नाव कमावून दुसऱ्याइच्या कामी पडजो. मी हाओ ना? तू जायाची तयारी कर. "

कोल्हापूरऐवजी विदर्भात कुठे जमू शकेल का, याचे प्रयत्न नाम्याने गणपतरावांच्या आणि जोशी मास्तरांच्या मदतीने केले. सरपंच बाईचे पत्र, ग्रामसेवकाचे पत्र, त्यांच्यामार्फत आमदारापर्यंतची मजल, प्रवेशसमितीशी केलेला पत्रव्यवहार सर्व सर्व निष्फळ ठरलं.

गावातल्या हितचिंतकांनी थोडीशी आर्थिक मदत केली. सखाराम शिंप्याने नाम्याला एक नवा ड्रेस शिवून दिला. ठरलेल्या दिवशी नाम्या जवळच्या रेल्वेस्थानकावर पोचला. यावेळी त्याला सोडायला गावातील किमान पंचवीसजण आले होते. शांत, सुस्वभावी

नाम्या अजातशत्रू होता. सतत इतरांच्या कामी पडणे, हा अनमोल गुण त्याच्यामध्ये होता. त्याच्या विविध गुणांमुळे तो सर्वांनाच आवडायचा.

रेल्वे गाडी निघाली. भावविवश निरोप झाला. दुसऱ्या दिवशी दुपारी गाडी कोल्हापूरला पोचली. राहायचं कुठे, खायचं काय अशा अनेक प्रश्नांनी गोंधळलेला नाम्या प्रवेशासाठी प्राचार्यांना भेटला. आपली कहाणी सांगितली. सोबतची पत्रे दाखवली. कोल्हापूरऐवजी विदर्भात कुठे जागा मिळवून देण्याबाबत विनंती केली. पण ते प्राचार्यांच्या अधिकारकक्षेबाहेर होतं. फी कमी असली तरी होतीच. इतरांच्या मदतीतून ती भरण्याची सोय झाली होती; पण राहण्याची सोय झाली नाही. एकच वसतिगृह होतं; पण ते केवळ मागासवर्गीयांकरिता. नाम्या मागासवर्गीय नाही, असं त्याचा शाळा सोडल्याचा दाखला सांगत होता. वसतिगृहातील गरीब विद्यार्थ्यांबरोबरच श्रीमंत दलित विद्यार्थ्यांना पाहून नाम्याला संपूर्ण भारत देशाची कीव कराविशी वाटली. वसतिगृहाबाहेरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले, अण्णाभाऊ साठे, राजर्षी शाहू महाराज अशा महान व्यक्तींच्या पुतळ्यांकडे पाहून नाम्याने रामराम ठोकला. जिवंत माणसांना जिथे नाम्याची दया आली नाही, तिथे निर्जीव पुतळे काय करू शकणार होते?

दोन दिवस थांबून, थंडीतल्या रात्री रेल्वेस्थानकावर काढून नाम्यानं इतरत्र प्रयत्न केले. सोय झाली असती कुणाच्या घरात किंवा खाजगी वसतिगृहात; पण त्यासाठी त्याला मोठी रक्कम मोजावी लागणार होती. फी, वह्या-पुस्तके, राहण्याची व जेवणाची सोय या सर्व गोष्टींसाठी लागणारा पैसा नाम्याचे दाते किती दिवस पुरवणार होते? नाम्या त्यांचा होता तरी कोण? आणि का घ्यावेत आपण त्यांचे पैसे? कुठवर असं ऋणात जगायचं? असा विचार करीत नाम्या अंबादेवीच्या मंदिरात पोचला. मंदिरात





चिक्कार गर्दी होती. 'चाला, पुढं चाला' म्हणत पुजारी, शिपाई भक्तांना पुढे ढकलत होते. कित्येक तासांचा प्रवास करून, कितीतरी वेळ रांगेत उभे राहून क्षणभरात अंबामातेचं दर्शन घेऊन भक्तांना बाहेर पडावं लागत होतं. नाम्यानं देवीकडे पाहिलं. त्याला ती पिंजऱ्यातील बंदिस्त पक्षाप्रमाणे केविलवाणी वाटली. माणसांच्या गर्दीत तिला गुदमरल्यासारखं होत असावं. नाम्यानं तिलाही रामराम ठोकला. शिपायानं त्याला पुढे ढकललं.

नाम्यानं रेल्वेस्थानक गाठलं. महाराष्ट्र एक्स्प्रेस उभी होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिनानिमित्त नागपूरकडे जाणारे जत्थेच्या जत्थे बाबासाहेबांच्या जयघोषात गाडीत प्रवेश करीत होते. नाम्याही गर्दीत सामील झाला. तिकिटाची गरज भासली नाही. प्रचंड गर्दीतही त्याला समाधान वाटलं. तणाव नाहीसा झाला. एकीकडे तो मागासवर्गीय नाही, म्हणून वसतिगृहात प्रवेश नाकारला गेला होता आणि आता दलित बांधवांसोबतच त्याची गावाकडे जाण्याची विनामूल्य सोय झाली होती. थंडीतली ती ऊब त्याला सुखावून गेली.

नाम्या गावात पोचला. गणपतराव गोंधळले.

"अबे नाम्या, काय झालं बे? वापस काऊन आला?"

नाम्याचा चेहरा केविलवाणा झाला. गणपतरावांना परिस्थितीची कल्पना आली.

"बरं बरं, जाऊ दे. काई नाई होत लेकाले. तू बी. ये. करजो आनू मंग बी.येड. करजो. नायतरी पायमरी मास्तरले इचारतेच कोन?"

"मालक, तुम्ही तर आता नवीन मुलगा कामाला ठेवला..."

"कोन म्हन्ते बे? आनू ठिवलाबी तं काय? मी काय तुले सोडनार हाय? उद्यापास्नं येजो तू. आनू नाई आला तं

पायजो मंग. आनू ज्येवला व्हता कालपास्नं? नसंनच ज्येवला. तुले मी चांगला वयखतो. जाय पाटलाच्या वाडीत तेरवीचं ज्येवन हाय."

नाम्याचे डोळे चकाकले. तो तडक पाटलाच्या वाडीत पोचला. पंक्तीवर पंक्ती उठत होत्या. मध्यभागी टेबलवर ठेवलेल्या कै. रामराव पाटलांच्या फोटोला नाम्याने रामराम ठोकला. पंक्तीत जागा पकडली आणि वीतभर पोटाची खळगी भरण्यासाठी तेरवीच्या भोजनाचा आस्वाद घेऊ लागला.

पूर्वप्रसिद्धी :

१. दै. लोकदूत, यवतमाळ, दीपावली विशेषांक २००२

आकाशवाणी प्रथम प्रसारण :

आकाशवाणी यवतमाळ, शुक्रवार, दि. २० सप्टेंबर, २००२







# गेले द्यायचे राहून

"मेधा, ही मामा आणि कंपनी परत कधी जाणार आहे?"

"अहो, कालच तर आलेत ते. इतक्यात कसे जातील? चार-सहा दिवस राहतील, मग जातील."

"नाकात दम करून टाकलाय सगळ्यांनी. मामाच्या ह्या दोन मुली आणि संजू आपल्या बंटीला सतत रडवत असतात. कधीकधी तर चक्क बदडत असतात."

"अहो, आपला बंटीही काही कमी नाही बरं, त्यालाही भांडाभांडीच हवी असते."

"पण रडतं कोण शेवटी? बंटीच ना? आणि मामाचे

कार्टे हसत राहतात फिदीफिदी."

"जाऊ द्या हो, लहान मुलं म्हटली की चालायचंच."

"आणि ही मामी, चक्क तुझ्याच साड्या वापरते आणि मेकअप बॉक्सचाही सत्यानाश करून टाकते."

"तुम्ही नका हो मनाला त्रास करून घेऊ."

"हा मामा, माझाच शेविंग सेट वापरतो. किमान ब्लेडतरी स्वतःचं आणावं, पण तेही नाही. शेवटी मला त्याच्यासाठी दरवर्षी वेगळं ब्लेडचं पाकीट आणून द्यावं लागतं."

"कितीही झालं तरी मामाच ना तुमचे?"

"हे बघ मेधा, हे काही सख्खे मामा नाहीत. बरंच दूरचं नातं आहे."

"नातं तर आहे ना? चला ऑफीसला उशीर होतोय, निघा आंघोळीला."

या मामाकुटुंबामुळे शरद चांगलाच त्रासला होता. दरवर्षी कणकवली ते नागपूर असा लांबचा प्रवास करून मामा, मामी आणि त्यांची तीन अपत्ये आठवडाभर मुक्कामासाठी आपल्या या दूरच्या भाच्याकडे येत असत.

"शरदा," नाकात बोलणारे मामा शरदला 'शरदा' अशी हाक मारीत असत. "तू ऑफीसला जातोय, तर मला बर्डीवर सोडतो का? थोडी खरेदी करीन म्हणतो."

"पण मामा, माझं ऑफीस त्या मार्गावर नाही."

"ऑफीस कोणत्याही मार्गावर असले तरी नागपुरातच ना रे? अरे, इकडून गेले काय आणि तिकडून गेले काय सारखेच."

"बरं, व्हा लवकर तयार."

"अगं ए, ऐकलंस का, आटप लवकर. शरदा सोडतोय आपल्याला."

मामीसह मुलांनी गलका केला. मेधा आणि बंटीच्या





आंघोळीपूर्वीच बाथरूम काबीज केली. मेधाला आज ऑफीसला उशीर होणार, हे निश्चित झालं.

सीताबर्डी येईपर्यंत मामेकुटुंबाचा मोटारीत गोंधळ सुरू होता. बर्डी येताच मामा म्हणाले,

"शरदा, सध्याचे तीनशे रुपये देतोस का? मी आणलेले आहेत रे, पण कमी पडायला नको ना? परत करीन हो तुझे."

शरदने निमूटपणे तीनशे रुपये आपल्यापेक्षा दहा वर्षांनी मोठे असणाऱ्या मामांच्या स्वाधीन केले आणि ऑफीस गाठले. घरी आल्यावरही शरदला मामाशिवाय दुसरा विषय सुचतच नव्हता.

"दरवर्षी असंच. दिलेले पैसे कधीच परत येत नाहीत. जातानाही प्रवासासाठी तीन-चारशे रुपये मागणारच. शिवाय तुझं त्या कार्ट्यांना पैसे देणं. आपल्या बंटीला कधी काही घेऊन दिलंय का त्यांनी? तू मात्र त्यांच्यावर नुसती उधळपट्टी करीत असतेस."

"अहो, तुम्ही कशाला एवढं मनाला लावून घेताय? वर्षातनं एकदाच येतात ना आपल्याकडे? वर्षभर तर काही त्रास नसतो आपल्याला."

तितक्यात काचेची कुठलीतरी वस्तू फुटल्याचा आवाज झाला. त्यापाठोपाठ मामीचं मुलांवर खेकसणं, मारल्याचा आवाज आणि मुलांचं मोठमोठ्यानं रडणं.

"छे! उच्छाद मांडलाय साऱ्यांनी." शरदने डोक्यावरून पांघरूण घेतलं. मेधा उठली. मुलांना मामीच्या मारापासून सोडवून 'मुलंच आहेत हो, चुकणारच. मारू नका त्यांना', असं म्हणत काचांचे तुकडे उचलू लागली.

शरदने मामेकुटुंबाचं परतीचं तिकीट काढून आणलं आणि मामांना आनंद झाला.

"शरदा, किती रे काळजी तुला मामाची? अरे परवा खरेदी केली तर पैसेच संपले. तुझ्यामुळेच प्रवासाची सोय झाली हो. खरंच, असले भाचे मिळत नाहीत जगात."

मामेकुटुंब जाण्याचा दिवस उजाडला. शरदने सुटी टाकली. दरवर्षीप्रमाणे मेधाने मुलांच्या हातावर खाऊ ठेवला. मामींना साडी दिली. निघता निघता शेवटची भांडाभांडी करून मुलेही आनंदाने निघाली. शरदने मामेकुटुंबाला गाडीत बसवलं आणि मगच सुटकेचा निःश्वास टाकला.

"आई, बाबांचे मामा कसे कंजूष आहेत गं? मला काहीच घेऊन देत नाहीत. माझा मामा आला की, मला सिनेमाला नेतो, आईस्क्रीम खाऊ घालतो, खेळही घेऊन देतो." बंटीच्या या बोलण्यावर मेधासह शरदलाही हसू आलं. कोकणातून येणाऱ्या या मामेकुटुंबाने ४-६ आंबे, एखादा फणस आणि ४-६ चिकू याव्यतिरिक्त कधी काही आणलं नव्हतं.

वर्षामागून वर्षे गेली. बंटी मोठा झाला. मामांची मुले मोठी झाली. नित्यनेमाने त्यांचे शरदकडे येणे सुरूच होते. एका उन्हाळ्यात मात्र मामेकुटुंब येणार नसल्याचे पत्र आणि लग्नाची पत्रिका आली. मामाने आपल्या दोन्ही मुलींची आणि मुलाचे लग्न एकाच मांडवात, एकाच मुहुर्तावर करण्याचे योजिले होते. मामेकुटुंब येणार नाही म्हटल्याबरोबर शरद आणि बंटीला फारच आनंद झाला. पण आता लग्नाला एवढ्या दूर जायचं, म्हणून मेधा विचारांत पडली.

"हे बघ मेधा, मी मुळीच लग्नाला जाणार नाही. हा मामा तिथेही सर्वांना पैसे मागत राहील आणि लग्नाची वरात सायकल रिक्षातून काढायला कमी करणार नाही. एखाद्या मंदिरात लग्न लावेल आणि मोजून पंचवीस माणसांना जेवण देईल."

"अहो, तुमचा मामेभाऊ आणि बहिणींची लग्न आहेत,





आणि तरी तुम्ही जाणार नाही? नाती अशी तुटतात का? माणसामाणसांची प्रवृत्ती असते वागण्याची. पण म्हणून का आपण त्यांच्याकडे जायचंच नाही?"

"हे बघ, तुला जायचं तर तू जा. मी येणार नाही."

शरद आपल्या निर्णयावर ठाम राहिला. बंटीची मनधरणी करून मेधाने त्याला सोबत नेले.

"मेधा, तू आलीस ते बरे केले हो. शरद येणार नाही, माहीत होतं मला. आता चांगले दहा दिवस राहायचे आमच्याकडे."

मामांनी एकाच मांडवात तिन्ही अपत्यांची लग्ने उरकली. सोहळा फार मोठा नव्हता. मुली सासरी जाण्यास निघाल्या तेव्हा मेधाच्याही डोळ्यांत पाणी तरळलं.

"बंटी, झालं गेलं विसरून जा. आता नाही येणार आम्ही तुझ्याशी भांडायला." आपल्या दोन्ही आत्यांचं बोलणं ऐकून बंटीलाही गहिवरून आलं.

मेधा आणि बंटीने चार दिवस कोकणातल्या निसर्गसौंदर्याचा आस्वाद घेतला. नागपूरला निघण्यापूर्वी मेधाला मामा म्हणाले, "मेधा, शरद आला असता तर बरे झाले असते हो. आता तुला म्हणू तरी कसा?"

"काय मामा? बोला नं तुम्ही."

"मेधा, लग्नासाठी इकडून तिकडून पुंजी जमवली. पण काही देणे बाकी राहिले आहे. तुझ्याजवळ असतील का?"

"किती हवेत मामा?"

"तशी तर पाच हजारांची गरज होती."

"हे घ्या मामा, वेळप्रसंगी अडचण नको यायला, म्हणून आणले होते मी सोबत."

मामा-मामींच्या डोळ्यांत पाणी उभं राहिल्याचं मेधाने

प्रथमच पाहिलं.

नागपुरात परतल्यावर बंटीने कोकणातील निसर्गाचे वर्णन करायला सुरुवात केली.

"ते सर्व राहू द्या. प्रथम मामांनी किती रुपयांचा चुना लावला ते सांगा."

"फक्त पाच हजार?"

"काय? पाच हजार?"

"जाऊ द्या हो, नातेवाईक आहेत आपले. चार दिवस मस्त कोकण ट्रीप झाली असं समजूया."

"लग्ने आटोपल्याने आता उन्हाळ्यात येऊन धुडगूस घालणाऱ्यांची संख्या मात्र कमी झाली, हाच एक दिलासा."

आणखी दोन वर्षे गेली. मामा-मामी आले नाहीत. अशीच एक सकाळ होती. बेल वाजली. मेधाने दार उघडलं तर मोठमोठाल्या तीन पिशव्या घेऊन संजू दारात उभा.

"अरे संजू, ये, आत ये. एकटाच आलास? मामा-मामी आणि तुझ्या सौभाग्यवतीला नाही आणलंस?"

संजूला बघताच शरदच्या कपाळावर आठ्या चढल्या. आता हा किती दिवस राहणार? मामांप्रमाणे हाही आता खिशाला चोट लावणार, असा विचार करीत शरदने वर्तमानपत्रात डोके खुपसले.

चहापाणी, आंघोळी आटोपल्या. दिवाणखान्यात निवांत बसून मेधा आपुलकीने संजूची चौकशी करू लागली. शरद आणि बंटी टीव्हीकडे बघत होते. त्यांचे कान मात्र मेधा-संजूच्या संभाषणाकडे होते.

"वहिनी, या पिशव्यांमध्ये चिकू, फणस, नारळ, हापूस आंबे आणि काजू आहेत. या बाटल्यांमध्ये कोकमचं सरबत करून पाठवलंय हिनं."





शरद-बंटी बघतच राहिले. इतक्या वर्षांत या लोकांनी एवढ्या मोठ्या प्रमाणावर कधीच काही आणलं नव्हतं.

"आणि हे बाबांचं पत्र. जाण्यापूर्वीच लिहून ठेवलं होतं त्यांनी."

"म्हणजे?" तिघांनाही धक्काच बसला.

"हो, दोन महिन्यांपूर्वीच गेले ते. कळवणार होतो तुम्हाला; पण... पण... आधीच आमच्यामुळे तुम्हाला इतका त्रास..."

"संजूऽऽ." मेधाला हुंदका आवरला नाही.

बंटीने टीव्ही बंद केला. शरदलाही काय बोलावं सुचेना. बंटीने पत्र उघडलं. मोठ्याने वाचण्यास सुरुवात केली.

*"शरदा,*

*दोन वर्षांपासून तुझ्याकडे येणे जमले नाही. आता कदाचित जमणारही नाही. पुष्कळ वर्षे त्रास दिलाय तुम्हाला. आता थोडे दिवसांचा सोबती आहे मी. वय झालंय. पिकले पान केव्हा गळून पडेल, याचा नेम नाही. गेल्या वर्षी तुझी मामी गेली...."*

*बंटी अडखळला. मेधा हुंदक्यावर हुंदके देऊ लागली. शरद स्तब्ध झाला.*

*"तेव्हाच कळवणार होतो तुला; पण तुझ्या मनातला आमच्याविषयीचा राग थोडीच दूर होणार होता. आम्ही तुम्हाला आनंद कधीच देऊ शकलो नाही. नेहमी त्रासच दिला. म्हणून या दुःखात तुम्हाला सहभागी करून आणखी वेदना देणे पटलेच नाही बघ मनाला.*

*शरदा, खूप छळलंय आम्ही तुम्हाला. पण परिस्थितीच तशी होती रे. कोकणात पिकतं खूप, पण विकलं जात नाही. भाव मिळत नाही. जगाशी संपर्कच येत नाही फारसा. आमचे*

*दिवस फार हलाखीचे होते. बचत म्हणून कधी झालीच नाही. दोन वेळचे जेवण, एवढीच अपेक्षा ठेवून जगतो हा कोकणी माणूस. पण पैसे नाहीत म्हणून रडत रडत चार दिवस जगून मरण्यापेक्षा चार माणसांच्या मदतीने आठ दिवस आनंदाने जगता आले तर वाईट काय? मी लाचार होतो. पण संजू आणि त्याच्या बहिणींना काही कमी पडू दिले नाही. त्यांचे बालपण हिरावून घेतले नाही. त्यांचे जीवन फुलावे म्हणून तुमच्यासारख्या चार माणसांना त्रास दिला. तुम्ही माणसे होतात, म्हणून सांभाळून घेतलेत आम्हा दुष्टांना. मेधासारखी मोठ्या मनाची गुणी पत्नी तुला लाभली, हे तुझे भाग्यच हो. खरेतर तुमच्यासारखी माणसे भेटली नसती, तर जगलो असतो आम्ही कुढत कुढत. तुमच्यासारख्यांच्या अन्नाने संपूर्ण भरलेल्या ताटामधून भाताची चार शितं घेतली तर तुम्हालाही उपाशी राहण्याची वेळ येणार नव्हती आणि आम्हा क्षुद्र किटकांनाही जगण्याचा आधार होत होता.*

*मामीला शांत मरण आले. अगदी समाधानाने. मुलांचीही लग्ने आटोपली. माझेही कर्तव्य संपल्यात जमा आहे. कर्जाचे डोंगर होते. पण आता राहणार नाहीत. शेतीचा बहुतेक भाग संजूला देऊन एक छोटा तुकडा ठेवला होता कर्जफेडीसाठी. तो आता विकलाय. मेधाने लग्नात पाच हजार रुपये दिले होते, ते पाठवत आहे. शिवाय दरवर्षी उन्हाळ्यात तुझ्या घरी येऊन शंभर-दोनशे-पाचशे असे पैसे घेत राहिलो. त्याचा हिशोब मी लिहून ठेवला होता बरं. ते एकूण तीन हजार चारशे पन्नास रुपये होतात. असे एकूण आठ हजार चारशे पन्नास रुपये आणि पन्नास पैसे संजूबरोबर पाठवत आहे. दरवर्षी तुला पैसे परत करीन म्हणून सांगायचो. पण परिस्थितीमुळे राहूनच गेले द्यायचे. याशिवाय मेधाने दिलेल्या भेटी, मुलांना खाऊ, बंटीसोबतची भांडणे या सगळ्यांतून माझ्या मुलांना मिळालेला मनमुराद आनंद या ऋणांतून*





*मुक्त होणे कठीण आहे. तरी अधूनमधून संजू फळफळावळांचा कोकणी मेवा नागपूरला पाठवत जाईल.*

*आता तुला प्रश्न पडला असेल, की वरचे पन्नास पैसे कशाचे आहेत? शरदा, माझी पूर्वीपासून इच्छा होती, की टेकडीवरच्या गणपतीच्या मंदिरापुढे बसलेल्या एखाद्या उपाशी भिकाऱ्याला पन्नास पैसे द्यावेत. तेही द्यायचे राहून गेले. आता देण्याची ऐपत आहे तर नागपूरला येणे शक्य दिसत नाही. म्हणून माझी एवढी इच्छा पूर्ण कर.*

*कळत-नकळत तुझ्याकडून काही कर्ज घेतले असेल आणि परतवले नसेल तर द्यायचे मनापासून होते, पण राहून गेले असे समजून घे.*

*- तुझाच मामा."*

बंटीने पत्रवाचन संपवलं. पिकलेल्या फणसातले गोड गरेही डोळ्यांतून आसवं काढून गेले. संजूने काढलेले पैसे शरदने तसेच परत केले. त्यातले फक्त पन्नास पैसे ठेवून घेतले, टेकडीवरच्या गणपती मंदिरापुढल्या एखाद्या उपाशी भिकाऱ्याला अन्नाची दोन शितं मिळावी म्हणून.

पूर्वप्रसिद्धी :

१. 'मंथन', दै. लोकमत, नागपूर,
रविवार, दि. २५ मे, २००३

२. 'साहित्य मैफील', दै. हिंदुस्थान, अमरावती,
रविवार, दि. ६ जुलै, २००३

३. 'एकता', पुणे, दीपावली विशेषांक २००४

आकाशवाणी प्रथम प्रसारण :

आकाशवाणी यवतमाळ, शुक्रवार, दि. २५ जुलै, २००३



# दुष्काळ

“आज कोन गेलं?”

“शंकऱ्याचा म्हातारा गेला.”

“म्येला?”

“मेला.”

“सुटला येकदाचा. आसं मरत मरत जगन्यापरीस झटक्यात मरनं बरं.”

पारावरच्या गप्पांना यापेक्षा वेगळा विषय नव्हता.

“कोनी सरकारचा मानूस आल्ता?”

“नाई, कोनीबी फिरकलं नाई. थ्यो येक इजेचं बिल देनारा आल्ता.”





“त्याले सांगतलं नाई, गावातल्या दुष्कायाचं?”

“सांगतलं. मान्सं किटकावानी मरत्यायत. खायाला आन्नाचा कन नाई. बारा मैल पान्याचा थेंब नाई. सरकार झ्वापलं हाय का?”

“मंग काय म्हने?”

“म्हने का थ्ये आमची ड्युटी नाई. आमचं काम बिलं वाटनं.”

“हिथं येंड्रीन खायाले पैशे नाई आन् सायाचे बिलं भरा म्हन्ते.”

तरुण मंडळी आता विद्रोहाच्या पावित्र्यात होती.

“आता शहरातल्या तयसील हाफीसावर मोर्चा न्यायाला हवा.”

“पन शहरात येवढ्या लोकाईनं जायाचं तं टिकिटाले पैसा कुठून आनाचा?”

“काई गरज नाई येवढ्याईनं जायाची. म्हाताऱ्याईले हिथंच ठेवाचं आन् जवान पोराईनं पैदल जायाचं.”

“चाळीस मैल?”

“हौ. चाळीस मैल. हिथं मरन्यापरीस तयसीलीपुढं मराचं.”

“पाटील, तुमास्नी काय वाटतं?”

“तुमी म्हनान तसं. सारे उपाय करून पाह्यले. जे धानधान्य व्हतं, ते समदं म्या गावाले वाटून देल्लं. ज्यायच्याजवय थोडाफार पैका व्हता, थ्ये गाव सोडून गेल्ले. पन् म्या पाटील म्हून गावची जबाबदारी झ्यटकली नाई.”

“पाटील, तुम्ही व्हता म्हून तं आठ दिस अधिक जगलो.”

दुसऱ्या दिवशी तरुण मंडळी शहराकडे निघाली.

असा दुष्काळ पूर्वी कधीच पडला नव्हता. दिवसभर आकाशाकडे डोळे फाडून आणि आऽवासून बघणारे म्हातारे 'आपली शेवटची घटका आलेली आहे', असंच बरळत राहायचे. दररोज भुकेमुळे एखाद-दुसरा माणूस किंवा जनावर आणि पेटलेल्या आकाशात उडण्याची चेष्टा करणारे पक्षी तडफडून मरत होते. बारा मैलांवरून पाणी आणायला बाईमाणसं दररोज पहाटे निघत होती. तेही पाणी आठ-दहा दिवसांपेक्षा अधिक पुरण्याची शक्यता नव्हती. गावात आता मोजकेच हाडांचे जिवंत सापळे उरले होते.

"आलात पोराईनू, काय झालं तयसीलीत?"

"कोनीबी भ्येटलं नाई."

"कोनीबी नाई?"

"चपराशी व्हते."

"काय म्हने?"

"सायेब लोकं दुष्कायाच्या परिस्तितीवर तोडगा काढाले ममईला मुख्यमंत्र्याकडं गेले."

"मंग तं काईतरी करंनच सरकार, नाई?"

"पन कव्वा? सारं गाव शमशान झाल्यावर? अर्दिआदिक जनावरं म्येली, मान्संबी म्येली. ग्रामसेवक दोन महिन्यापास्नं फरार हाय. आनू सरकारचा येकबी मानूस गावात येत नाई का कोनी पुढारी त्वांड दाखवत नाई."

"तरी मले वाटते का मदत यीन म्हून. पन आपन आता पेरनीची तयारी कराया नको का?"

"बी-बियानं कुठनं आनाचं? हिथं आपल्याले खायाले काई नाई तं बैलाईले काय खाऊ घालान? ते तशेही मरूनच राह्यले, कामाले जुतले तं आताच मरतीन."

"येक करता यीन. आपन गावातली सारी जनावरं येक कराची. त्यातली मराया टेकलेली, रोगट असनारी इकायला





न्यायाची. इकून जे पैसे येतीन, त्यातनं बी-बियानं आनाचं आनू साऱ्याइले वाटाचं."

"पावसाचा पत्त्या नाई. पेरनी केली तं बियानं जळून जाईल सारं."

"पेरनी आताच नाई, पावसाच्या तोंडी करू. नांगरून तयारीत राहू."

"पनू ही मुरदाड जनावरं कोन घ्येनार? आजूबाजूची पाच-पन्नास गावंबी दुष्कायानं मरनवाटंला लागलीया."

"तयेगावच्या बाजारात न्याची."

"तयेगावला? म्हंजे कसायांच्या बाजारात?"

"व्हय. आता थ्योच येक उपाय हाय."

"नाई, नाई, आपन पोसलेली, लहानाची मोठी केलेली, आपल्या कायजाचा तुकडा म्हून जपलेली जनावरं कसायाला इकायची? आनू तिथनं ती शयराच्या कारखान्यात जातीन. मशीनवर कापली जातीन. कातडी अलग, हड्‌ड्या अलग, शिंगं अलग आनू चुरा करून खत केलं जाईन. आसे हाल हाल करून माराची आपली जनावरं?"

"तशीबी तं मरून रायलीच भुकेनं तडफडून."

"पन मरनं आनि मारनं यात फरक हाय."

निर्णय ठाम होत नव्हता. रेडिओ सांगत होता - 'पावसाची शक्यता वेधशाळेने व्यक्त केली आहे. एखाद-दुसऱ्या ठिकाणी मुसळधार पावसाच्या सरीही कोसळतील.' हवामानाचा अंदाज ऐकून गावकऱ्यांच्या चेहऱ्यावर आशा पल्लवीत झाल्या. शेतकरी बंधूंसाठी सादर केल्या जाणाऱ्या कार्यक्रमातही पेरणीचे आवाहन करण्यात आले.

शेवटी कठीण अंतःकरणाने मरायला टेकलेल्या बारा जनावरांना गावात मरण येऊ देण्यापेक्षा तळेगावच्या बाजारात

नेऊन विकण्याचे ठरले. पहाटेच काही मंडळी त्या जनावरांना घेऊन निघाली. गावावर शोककळा पसरली. आसवं गाळत सगळी जनावरं विचित्र आवाजात ओरडू लागली. थरकाप उडवणाऱ्या भेसूर आवाजानं आसमंत थरथरलं. आपल्या जनावरांना कधीही न मारणारे मालक आज पाय न उचलणाऱ्या जनावरांना काठीने मारू लागले. ही विरहाची जाणीव की मृत्यूची चाहूल? म्हाताऱ्यांना दुःख आवरत नव्हतं.

मरणासन्न अवस्थेतील त्या जनावरांना घेऊन तळेगावचा बाजार गाठायला गावकऱ्यांना दुपार झाली. प्रचंड मोठा बाजार. मैलन् मैल पसरलेला. हजारो जनावरं. आजूबाजूच्या कितीतरी गावांमधून आलेली. काही ट्रकमधून आणलेली. मरणासन्न अवस्थेतली. उत्तम प्रतीचीही. परिस्थितीने विवश झाल्याने विकायला आणलेली. काही चोरून आणलेली. काही नित्यनेमाने बी-बियाणांच्या खरेदीसाठी विक्रीला काढून नंतर दुसरी खरेदी करण्याच्या इच्छेने आणलेली. काही स्वतःचं पोट भरून जिवंत राहण्यासाठी त्यांना मृत्यूच्या हवाली करण्यासाठी आणलेली. काही आनंदाने. काही अतीव दुःखाने. खरेदी करणाऱ्यांचीही गर्दी. काही व्यापारी. काही कसाई. काही कारखानदार. काही पशुसंशोधक. बहुतेक जनावरं मात्र कारखान्यात नेऊन कापण्यासाठीच हा बाजार.

संध्याकाळपर्यंत न कापणारं गिऱ्हाईक मिळालं नाही. कापणारे मिळाले; पण किंमत मिळत नव्हती.

"बोलो, दे रहे क्या एक-एक हजारमें? बारहभी ले लेंगे."

"आवो पठाण, आम्ही या जनावरास्नी मायेनं लहानाचं मोठं केलं. कालपरवापातूर लय उमदी जनावरं व्हती ही. आता दुष्कायामुळं खंगलीया. तशी लय बहाद्दर गडी हायत ही."

"मगर अब ये खेतीके कामके नही रहे. इन्हे





फैक्ट्रीमेंही भेजना पडेगा."

भाव करून जड अंतःकरणाने दीड-दीड हजारात जनावरं विकून बी-बियाणं खरेदी करून
गावकरी मध्यरात्री गावी परतले. गावातली मंडळी वाट बघतच होती. गावात पोचल्यावर मात्र दुःखाचा बांध फुटला. रडू आवरेनासं झालं. मायेनं पोसलेली, लहानाची मोठी केलेली जनावरं कारखान्यात मृत्यूच्या रांगेत उभी केल्याचं पाप नाइलाजानं करावं लागलं होतं. माणसांसह उर्वरित जनावरांचाही आक्रोश रात्री उशीरापर्यंत सुरू होता.

खपाटल्या पोटांनी गाव नांगरून काढलं होतं. पावसाची चिन्हं दिसताच पेरणी होणार होती. नक्षत्रामागून नक्षत्रं कोरडी जाऊ लागली. मरण रोज येत होतं; पण पाऊस येत नव्हता. बारा मैलांवरचं पाणीही संपलं. रेडिओ रोज पावसाची शक्यता वर्तवत होता. वरचा बाप भीक घालत नव्हता. चारापाणी शेवटचं कधी मिळालं, तेही आठवेनासं झालं. रानोमाळ भटकणाऱ्या गुरांना काहीही मिळत नव्हतं. म्हाताऱ्यांच्या माना टाकण्याचं प्रमाण आता वाढलं होतं. बेवारस जनावरांना पुरून कंटाळलेल्या गावकऱ्यांना आता सडलेल्या दुर्गंधीचा सामना करावा लागत होता. रोगराई पसरू लागली.

एका सकाळीच ग्रामसेवक, पोलीस आणि खादीतली माणसं येऊन गेली. त्यांच्याशी वाद घालण्याचं त्राणही आता गावकऱ्यांमध्ये उरलं नव्हतं. त्यांनी दिलेल्या बातमीने थोडासा जीवात जीव आला.

दुसऱ्या दिवशी मंत्री आले. सोबत शंभर खाकी आणि खादीतली माणसं. काही हत्यारवाली. काही लेखणीवाली. काही फोटो काढणारी. तीन तास भाषणे चालली, टेबलवर ठेवलेल्या बाटलीबंद थंडगार पाण्याचा आणि शीतपेयांचा आस्वाद घेत.

चोवीस तासांच्या आत गावाला टँकरने पाणीपुरवठा होईल, अन्नधान्याची पोती वाटण्यात येतील, पेरणीसाठी बी-बियाणं दिलं जाईल, विद्युतबिले माफ होतील अशी आश्वासनं देऊन मंत्री निघून गेले. रात्री सगळं गाव शांत, जणूकाही घडलंच नाही. पण अन्नाचा कणही न खाता आणि पाण्याचा थेंबही न पिताच गावकरी पोट भरल्याची स्वप्ने पाहू लागले.

तब्बल आठवडा गेला. कुठलीही मदत आली नाही. अन्नधान्यही नाही आणि पाणीही नाही. पण आभाळ आलं. पाऊस पडणार असं वाटू लागलं. हाडांचे सापळे पेरणीसाठी धावले. कसेबसे राबले आणि वरुणराजाला साकडं घालू लागले.

ढग आले आणि गेले. पाऊस पडला नाही. बियाणं जळून गेलं. सहनशीलतेचा बांध फुटला. दुःखाचा आक्रोश सुरू झाला. दोघांनी आत्महत्या केल्या. आता शहरात जाऊन तहसील कार्यालय पेटवून देण्याची योजना तरुणांनी आखली. पहाटेच तरुण मंडळी आणि काही म्हातारे शहराकडे निघाले. गावात मोजकीच मंडळी उरली.

सरकारी इमारत पेटविण्याचा प्रयत्न केल्याच्या आरोपाखाली गावकऱ्यांना दुपारी अटक झाली. त्याच सुमारास ढग भरून आले. मुसळधार पाऊस सुरू झाला. गावातल्या बायाबापड्यांमध्ये आणि जनावरांमध्ये जल्लोश सुरू झाला, शहरात गेलेली पुरुषमंडळी परत येतील, तेव्हा आनंदानं बेभान होतील, या वेड्या आशेवर. रेडिओ सांगत होता, 'आकाश निरभ्र राहील. हवामान कोरडं राहील.' पावसानं थैमान घातलं. प्रचंड पाऊस. थांबण्याची चिन्हं नव्हती. पण आला तो अर्धेअधिक गावकरी आणि जनावरं मरण पावल्यावर. उर्वरित कारागृहात गेल्यानंतर.

"अन्नधान्याची मदत दिल्लीवरून मंजूर झाली आहे आणि लवकरच आपल्या गावात पोचणार आहे." मुसळधार





पावसातही गावात येऊन ग्रामसेवक आनंदाने ओरडून ओरडून सांगत होता. म्हाताऱ्या बाया खाटेवर पडल्या पडल्या त्याला भरल्या हृदयातून आशीर्वादावर आशीर्वाद देत होत्या.

पूर्वप्रसिद्धी :

१. 'शब्दयात्रा', दै. लोकदूत, यवतमाळ, रविवार, दि. १७ जुलै, २००४

२. दीप प्रतिष्ठान, दीपावली विशेषांक २००३



# बाई

मोटारीची वेळ झाली होती. वाहक महोदय घंटी वाजवीत होते. चालक महोदयांचं आगमन व्हायचं होतं. इतक्यात धापा टाकत, धावपळ करीत आलेल्या पन्नाशीच्या वयाच्या, लठ्ठ आकारमानाच्या एक महोदया मोटारीत चढल्या आणि जाड भिंगाच्या चष्म्याआडून जागा शोधू लागल्या. नेमकी माझ्या समोरच्या बाकड्यावरच त्यांना जागा मिळाली.

"पोचली बाई एकदाची. मला वाटलं आज बस मिळणारच नाही. पण मिळाली. अहो, वेळेवर पोचावं लागतं आमच्या शाळेत. नाहीतर लाल शाईने सही करावी लागते. तीन वेळा लाल शाईने सही झाली तर पगार कापतात हो." आपल्या





शेजारी बसलेल्या अनोळखी स्त्रीला त्यांनी मोठ्यानं सांगितलं, जेणेकरून इतर प्रवाशांनाही ऐकू जावं. काही प्रवासी हसले.

"तुम्ही शाळेत शिकवता?" शेजारच्या बाईंनी विचारलं.

"हो नं, तेच तर सांगत होते. अहो, वेळ म्हणजे वेळ. शिक्षकांनी ती पाळलीच पाहिजे. मी आमच्या सहकाऱ्यांना वेळेचं महत्त्व सांगते, तर ते हसतात मला. फारच वात्रट आहे मेले."

बाईंच्या बडबडीनं आमचं मनोरंजन होत होतं; पण वाहक महोदयांना हे नेहमीचंच असावं. ते खाली उतरून आरामात कोणाशी तरी गप्पा मारीत उभे होते.

"अहो कंडक्टर, चला नं लवकर. किती उशीर करता? आधीच तर बस लेट झालीय. वेळेवर तुम्ही बस लावत नाही आणि वेळेवर सोडत नाही. म्हणून आम्हाला उशीर होतो आणि मग मुख्याध्यापकांची बोलणी खावी लागतात."

"अहो बाई, मी कंडक्टर नाही. कंडक्टर खाली उतरले आहेत. मी तर प्रवासी आहे."

"अहो, मग बसलात कशाला कंडक्टरच्या जागेवर. लोक समजतील तुम्हीच कंडक्टर आहात म्हणून. कमालच असते माणसांची. 'वाहक' म्हणून एवढं त्या बाकड्यावर लिहिलं असूनही वाचता येत नाही. मी सांगते ताई, अजूनही खेड्यापाड्यांत शिक्षणाची गंगा पोचलीच नाही. निदान प्रौढ साक्षरतेचे तरी वर्ग व्हायला हवेत; पण कोणी लक्ष देत नाही. आमचं तोंड दुखतं बोलून बोलून."

"तोंड दुखतं तर गप्प बसाना." असं पुटपुटत ते गृहस्थ वाहकाच्या जागेवरून उठले आणि दुसरीकडे बसले.

चालक महोदय स्थानापन्न झाले. त्यांनी मोटार सुरू केली.

"अहो ड्रायव्हरसाहेब, आज किती उशीर केलात? चला लवकर आता. काढा गाडी. उशीर होतोय ना आम्हाला."

"अहो बाई, कंडक्टरला तर येऊ द्या. घंटी न वाजताच मी कशी बस नेऊ?"

"बघा ताई, हे असं असतं. मघाशी कंडक्टर होता, तर ड्रायव्हर नव्हता आणि आता ड्रायव्हर आहे, तर कंडक्टर नाही. कशी प्रगती होणार या देशाची? अहो, अमेरिका, फ्रान्स, जपान ही राष्ट्रे किती पुढे गेली आहेत. आपल्याला जर पुढे जायचं असेल तर सर्वांना हंटर मारून सरळ केलं पाहिजे. हो की नाही हो?" असं म्हणत बाईंनी मागे आमच्याकडे वळून बघितलं.

"हो हो." या व्यतिरिक्त आम्ही काय बोलणार?

वाहक महोदय आत शिरले. पुन्हा 'टण् टण् टण् टण्' घंटी वाजवू लागले.

"काय हो कंडक्टर, किती उशीर करताय? मघाशीपण 'टण् टण् टण् टण्' घंटी वाजवली, आतापण तशीच वाजवताय. ड्रायव्हरसाहेब केव्हाचे आले आहेत. चला आता. या गाडीत अपडाऊन करणारे कितीतरी प्रवासी असतात, माहीत आहे ना तुम्हाला? वेळेवर पोचली नाहीत मंडळी तर पगार कापतात. हा भुर्दंड भरणार का तुम्ही? आता 'टण् टण् टण् टण्' घंटी वाजवू नका, 'टण् टण्' वाजवा नि चला."

"अहो बाई, अजून दोन मिनिटे बाकी आहेत बस सुटायला."

"तुमचं घड्याळ बंद असेल हो. नाहीतर मागेतरी नक्कीच असेल. हे बघा, माझ्या घड्याळात केव्हाचेच सव्वा आठ वाजून गेलेत. काय हो काका, बरोबर आहे ना?" बाजूच्या बाकड्याकडे बघत बाईंनी विचारलं. बाजूच्या बाकड्यावरील बाईंपेक्षा फारसा म्हातारा नसलेला गृहस्थ दचकून केसांवरून हात फिरवू





लागला. आपण या बाईंचे काका शोभतो का, या विचाराने तो काळजीग्रस्त झाला.

वाहक महोदयांनी घंटी वाजवली. मोटार सुरू झाली. ठिकठिकाणी रस्त्यांच्या कडेला उभ्या प्रवाशांना घेत घेत ती पुढे जाऊ लागली.

"हे काय हो कंडक्टर, ही काय ऑर्डिनरी गाडी आहे? एक्स्प्रेस म्हणता आणि कुठेही थांबवता? अशानंच तर बसेस लेट होतात आणि प्रवाशांनाही वाईट सवयी लागतात."

"अहो बाई, गावातून बाहेर पडेपर्यंत प्रवासी दिसले की थांबवावीच लागते बस. तशा सूचनाच आहेत आम्हाला."

"बघितलं ताई, काय हाल झालेत या देशाचे. अहो, मी तुम्हाला सांगते, या ट्रॅव्हल्स एवढ्या भरभरून जातात, काळीपिवळीवर प्रवासी लोंबकळून जातात आणि ह्यांना प्रवासी मिळत नाहीत."

बाजूच्या बाईंनी झोपेचं सोंग घेतलं. मग ह्या बाईंनी आपला मोर्चा पुढील बाकड्यावरील प्रवाशांकडे वळवला.

"काहो, हा ड्रायव्हर बस चालवतोय की बैलगाडी? काही वेगच पकडत नाही. इंजिनात दोष आहे की ड्रायव्हरला बरं नाही, काही कळत नाही. आज उशीर होणारच."

"अहो बाई, मग घरून लवकर नाही का निघायचं?"

"असं कसं म्हणता तुम्ही लवकर निघायचं? घरी स्वयंपाक करून, मुलांना शाळा, कॉलेजात पाठवून मगच निघावं लागतं. दीड तास तर प्रवासातच जातो. संध्याकाळी घरी पोचायला रात्र होते. पुन्हा स्वयंपाक, मग आवराआवर आणि झोप. या सगळ्यांतून आणखी लवकर निघायचं म्हणजे कसं शक्य आहे? तो अन्याय नाही का होणार माझ्यावर?"

"हो हो." समोरच्या गृहस्थांनी माघार घेतली.

"काय हो ड्रायव्हरसाहेब, थकवा आलाय का तुम्हाला? जरा जोरात पळवा नं बस. काय कासवगतीने चालवताय? सायकलवालेही पुढे जातील आपल्या."

चालक महोदयांनी लक्ष दिलं नाही. बाईंच्या ह्या बडबडीचा त्यांनाही अनुभव असावा. प्रवासात मध्ये दोन थांबे लागले. तिथेही बाईंची घाई सुरूच होती. तोंडाला विश्रांती म्हणून नव्हतीच. चढणाऱ्या प्रवाशांना 'पुढे व्हा, मागे व्हा' अशा सूचनाही सुरू होत्या. जवळपासच्या प्रवाशांशी मुक्त संवाद सुरू होता. त्यांच्या या संवादाला अनेक प्रवासी कंटाळले. काहींनी बाईंच्या जवळपासच्या जागा सोडून दूरच्या बाकड्यांना पसंत केलं. काहींनी तक्रारीचा सूर काढला.

"अहो बाई, जरा झोपू द्यानं आम्हाला. केव्हाची बडबड सुरू आहे तुमची?"

"मी? मी बडबड करते आहे? अहो, कमालच करता तुम्ही. इथे बसलेला प्रत्येकजण बडबड करतो आहे आणि तुम्ही फक्त मलाच म्हणता? आणि काय हो? बसमध्ये तुम्ही काय झोपा काढण्यासाठी येता? अहो झोप घरी घ्यायची. बस प्रवास करण्यासाठी असते. तुमच्या झोपण्याने ड्रायव्हरला झोप लागली तर?"

एकदाचा बाईंचा थांबा आला. बाई उतरल्या. जाता जाता उशीर केल्याचा आरोप वाहक व चालक महोदयांवर करून ओळख नसतानाही आजूबाजूच्या पाच-सहा प्रवाशांचा त्यांनी 'येते हं' म्हणून निरोप घेतला. बाई जाताच थोडीशी खसखस पिकली.

मोटार पुढे निघाली. आता सर्वत्र शांतता होती. झोप काढावी म्हणून डोळे मिटले. पण झोप येईना. जाड भिंगाच्या चष्यातून पाहणाऱ्या त्या गलेलठ्ठ बाईंचे किस्से आठवू लागले. पुढला प्रवास सुन्या मैफिलीप्रमाणे वाटू लागला. बाईंना टोमणे मारणाऱ्यांनाही सुनंसुनं वाटू लागलं.





इकडे बाई लगबगीनं चालत चालत शाळेकडे निघाल्या; पण घड्याळ पाहून त्यांना वाटलं, की आणखी उशीर झाला तर लाल शाईने सही करावी लागेल, म्हणून त्यांनी रिक्षा केली. रिक्षवाल्याशी भाव करण्यात त्यांनी पाच मिनिटं घालवली. एकदाच्या शाळेत पोचल्या तर शाळेला कुलूप.

"अगंबाई, खूपच उशीर झाला वाटतं. रघूऽऽ, ए रघूऽऽ, दरवाजा उघड लवकर."

"बाई तुम्ही?"

"अरे, उघड ठोंब्या, बघत काय राहिलास? आधीच उशीर झालाय. साहेब आलेत का?"

"नाही. साहेब आज येणार होते का?"

"मुर्खा, हा काय प्रश्न झाला? उघड लवकर. तुझ्याशी बडबड करायला मला वेळ नाही. आधीच त्या ड्रायव्हरनी उशीर केलाय."

रघूने शाळेचा मुख्य दरवाजा उघडला. बाई आत शिरल्या. बघितलं तर ऑफीस बंद आणि खोल्याही बंद.

"रघू, काय ड्युटी करतोस की झोपा काढतोस? अजून खोल्या उघडल्या नाहीस? तुझा पगारच कापायला पाहिजे."

"पण बाई, आज काही कार्यक्रम आहे का?"

"ठोंब्या, कार्यक्रम कशाला पाहिजेत? रोजची शाळा नाही का?"

"अहो बाई, आजतर रविवार आहे."

"आँऽऽ."

"हो. सुटी आहे आज."

"अरे देवा, सगळी धावपळ फुकट गेली म्हणायची. काय रे रघ्या, मला कालच का आठवण करून दिली नाहीस की उद्या रविवार आहे म्हणून?"

"चुकलं बाई माझं."

"आणि ते मेले ड्रायव्हर, कंडक्टर रोज मला अपडाऊन करताना बघतात आणि त्यांनीही सांगितलं नाही मला. छे, सगळं सगळं फुकट गेलं रे देवा."

हा किस्सा बाईंनी पुढच्या कितीतरी प्रवासांमध्ये प्रवाशांना ऐकवला होता आणि आज रविवार तर नाही ना? आज सुटी तर नाही ना? याची खात्री करून घेतली होती. पुढे चार-पाचवेळा त्यांची व माझी प्रवासात भेट झाली. छान मनोरंजन व्हायचं. प्रवास संपेपर्यंत बडबड संपायची नाही. त्यांच्या मनात मात्र काही नसायचं. निरागस बालकाप्रमाणे त्यांचं बोलणं असायचं. त्यांना दुरून लगबगीने येताना पाहून मी त्यांच्यासाठी जागाही ठेवायचो. वर्तमानपत्र खरेदीची किंवा खिडकीतून बाहेर बघायची गरज नसायची. झोपेसाठी डोळे मिटायची तर नाहीच नाही. उलट रोजच्या धावपळीतही खळाळून हसण्याची विनामूल्य संधी उपलब्ध व्हायची.

गेल्या काही महिन्यांपासून माझ्यासारख्या काही प्रवाशांचे डोळे प्रवासात त्यांचा शोध घेत होते; पण त्या दिसल्या नाहीत. एक दिवस अचानक मोटार सुटण्याच्या काही मिनिटे अगोदर त्या येताना दिसल्या. मला खूपच आनंद झाला. आज पुष्कळ दिवसांनंतर पुन्हा हास्याची कारंजी उडतील, या कल्पनेने माझ्यासह काही नेहमीच्या प्रवाशांच्या मनाला गुदगुल्या झाल्या. मी बाईंसाठी शेजारची जागा ठेवली. पण आज त्या नेहमीच्या लगबगीने आल्या नाहीत. ती धावपळ जाणवली नाही. चालक-वाहकांनी मोटार सोडायला जरा उशीरच केला. तरी त्या काही बोलल्या नाहीत. माझ्या शेजारीच त्या बसल्याने भरपूर बोलता येईल असं वाटलं होतं; पण आज त्या फारशा बोलल्या नाहीत. मीच मध्ये मध्ये 'हे ड्रायव्हरलोक बसही बैलगाडीप्रमाणे





चालवतात, वेळेची किंमतच कळत नाही त्यांना, अशानं या देशाचं कसं होईल?' असे त्यांचेच जुने संवाद त्यांना बोलकं करण्यासाठी मुद्दाम फेकत होतो. पण बाई फक्त 'हो, नाही' या व्यतिरिक्त काही बोलल्या नाहीत. ज्या मनोरंजनाच्या आशेनं मी त्यांना शेजारी बसवलं होतं, ती आशा धुळीस मिळाली. घरी भांडण झालं असेल का? शाळेत पगार कापला असेल का? कोणी काही त्यांना बोललं असेल का? असे अनेक प्रश्न माझ्या मनात हेलकावत होते.

मोटार थांबली. बाई उतरल्या. अगदी संथ गतीने चालू लागल्या. आतामात्र मला राहावलं नाही. मी खिडकीतून डोकं बाहेर काढून बाईंना विचारलं,

"बाई, आज तुम्ही काहीच बडबड केली नाही? पगारवगैरे कापला गेला का?"

बाई थांबल्या. माझ्याकडे बघून उदास हसल्या.

"तसं नाही हो. पगारवगैरे अगदी व्यवस्थित होतोय. आतातर उशीर झाला तरी पगार कापत नाहीत साहेब माझा."

"मग घरी काही प्रॉब्लेम?" माझा भोळसट प्रश्न.

"नाही. कुटुंब मजेत आहे. सगळे आपुलकीनं वागतात. माझी काळजी घेतात. स्वयंपाकालादेखील बाई लावली आहे."

"मग तुम्ही आज काहीच बोलल्या नाहीत पूर्वीसारखं?"

"आता बडबड कराविशीच वाटत नाही, सर. खूप वर्षे केलीय बडबड. कित्येकांना त्रास झाला असेल माझ्या बडबडीचा. मनातल्या मनात अनेकांनी शिव्याही दिल्या असतील. तुम्हालाही माझ्या वटवटीचा त्रास झाला असेल तर माफ करा. पण आता इच्छाही राहिली नाही आणि होतही नाही माझ्याकडून बडबड. थकवा येतो मला थोडं जरी बोललं तर. ब्लड कँसर झालाय सर

मला."

बाईंच्या डोळ्यांत तराळलेले पुसटसे अश्रू चटका लावून गेले. तोंडातून शब्द फुटले नाहीत. वाहकासह नेहमीचे प्रवासीही स्तब्ध झाले. बाईंनी पाठ फिरवली. हलक्या हाताने वाहकाने घंटी वाजवली. मोटार निघाली. प्रवास सुरू झाला; पण उदास अशी विस्तीर्ण पोकळी पसरलेल्या अवस्थेत.

पूर्वप्रसिद्धी :
१. 'शब्दयात्रा', दै. लोकदूत, यवतमाळ,
रविवार, दि. ९ जानेवारी, २००५
आकाशवाणी प्रथम प्रसारण :
आकाशवाणी यवतमाळ, शुक्रवार, दि. १३ फेब्रुवारी, २००४







# संगीता

संगीता सुधीरची आतुरतेने वाट बघत होती. लग्नाचा वाढदिवस संध्याकाळी हॉटेलमध्ये डिनर करून, एखादा चांगला चित्रपट बघून दोघांनीच साजरा करायचा, असं ऑफीसला जाताना तो बोलला होता. दोघांचंही एकमेकांवर प्रेम होतं. कुठलाही निर्णय संगीताच्या संमतीशिवाय सुधीर घेत नसे.

लवकर येतो म्हणून सांगून गेलेला सुधीर साडेसात वाजले तरी घरी आला नाही, म्हणून तिला काळजी वाटू लागली. मनात ॲक्सिडेंटची शंका आली आणि संगीताने चटकन देवाजवळ जाऊन दिवा लावला आणि अशुभ निवारणाची प्रार्थना म्हटली. बाहेर अंधार पडला. सुधीरच्या स्कूटरचा आवाज येईना, तशी

तिने साडी बदलली, दाराला कुलूप लावलं आणि किल्ली शेजारच्या काकूंना देऊन 'सुधीर आले तर त्यांना किल्ली द्या' एवढेच सांगून ती भराभर बसस्टॉपकडे चालायला लागली.

आज नशीबच फिरलं होतं की काय कोणजाणे, बसही लवकर येईना. कुणीतरी चार-पाच टारगट तरुण बसस्टॉपवर येऊन थांबले आणि संगीताची छेड काढू लागले. घाबरलेली संगीता एवढ्या अंधारात एकटं घराबाहेर पडण्याची दुर्बुद्धी झाली, म्हणून स्वतःलाच दोष देऊ लागली. त्या गुंडांशिवाय कुणी चिटपाखरूही बसस्टॉपजवळ दिसत नव्हतं. अचकट विचकट काहीतरी बोलून ते संगीताच्या जवळ सरकू लागले. संगीताने घाबरून धूम ठोकली. घराच्या दिशेने न पळता ती सुधीरच्या ऑफीसच्या रस्त्याला लागली. तेवढ्यात एकानं तिचा पदर धरला. मागचा पुढचा विचार न करता तिनं फाडकन त्याच्या थोबाडात मारली. गाल चोळायला त्याने तिचा पदर सोडताच ती पुन्हा पळू लागली. अंधारी गल्ली पाहून ती एका गल्लीत शिरली; पण गल्लीतही कुणी नरपशू नसेल ना, या शंकेपायी कुठेतरी ऑटोरिक्षाचा आवाज येताच ती बाहेर पडली. रिक्षावालाही त्या टोळक्याच्याच लायकीचा असावा. 'ये सुंदरी, बस, तुला फिरवून आणतो' असलं घाणेरडं बोलून तिच्या अगदी जवळून तो रिक्षा चालवू लागला. संगीताला भोकाड पसरून रडावंसं वाटू लागलं.

तेवढ्यात समोरून एक स्कूटर आली. भेदरलेल्या संगीताला पाहून स्कूटर थांबली. तिच्या नशिबाने शेजारचे देशपांडेकाका ऑफीसातून घरी जायला निघाले होते.

"संगीता, एवढ्या उशिरा एकटी कुठे निघालीस? आणि घाबरली आहेस किती? चल, घरी जायचंय का?"

अत्यंत प्रेमळ विचारपूस ऐकून संगीताला रडू फुटलं. गुंडांच्या आणि रिक्षावाल्याच्या तावडीतून सुटल्याच्या समाधानाचे





अश्रू होते ते! स्फुंदत स्फुंदत तिने संध्याकाळी सुधीर घरी न आल्यामुळे बेचैन होऊन घराबाहेर पडल्याची आणि रस्त्यात झालेल्या छेडखानीची हकिगत काकांना सांगितली.

"रडू नकोस, चल, मी तुला सुधीरच्या ऑफीसात सोडतो." काकांनी धीर दिला.

दोघेही सुधीरच्या ऑफीसजवळ आले. सुधीरची स्कूटर स्टँडवर होती, त्याअर्थी तो ऑफीसात आहे, याचं संगीताला समाधान झालं. वरच्या मजल्यावर काही भागात लाइट्स दिवस होते.तिथेच कुठेतरी सुधीर काम करत असेल, म्हणून दोघेही लिफ्टकडे निघाले. तेवढ्यात सुधीरचा मित्र रमेश लिफ्टमधून बाहेर पडला व स्कूटरस्टँडकडे निघाला.

दिसायला रुबाबदार, मिष्कील स्वभावाचा रमेश संगीताला पाहून आश्चर्यचकित झाला. सुधीरबरोबर तीन-चार वेळा घरी आला होता तो. संगीताला त्याचा विनोदी आणि मनमोकळा स्वभाव खूपच आवडायचा. पण सुधीरला मात्र तो संगीताशी बोलतो, हेच आवडत नव्हते. त्यामुळे तो घरी आला की, सुधीरच्या कपाळावर अलीकडे आठ्या पडायच्या. 'त्याचं कॅरेक्टर चांगलं नाही. तो मुलींना फसवतो' असं काहीतरी संगीताला सुधीरने सांगितलं होतं.

"नवऱ्याला शोधायला आलीस का? दहा-पंधरा मिनिटांत निघेलच तो. चल, तुला त्याच्याकडे सोडतो नि मी घरी जातो." असं म्हणून रमेश संगीतासह लिफ्टकडे वळला. देशपांडेकाकाही 'आता रमेश नेतोच आहे तुला सुधीरकडे, तर मी जातो ग संगीता' असं बोलून निघून गेले.

"आज काही विशेष आहे वाटतं? सुधीरला न्यायला स्वतः आली ऑफीसात?" रमेशने विचारलं.

संगीताने लग्नाचा वाढदिवस असल्याचं आणि सुध

ीरला उशीर झाल्यामुळे घडलेल्या घटनांचा तपशील सांगितला. लिफ्ट वर गेली होती. ती खाली येईपर्यंत ते दोघं गप्पा मारत बाहेर उभे होते. लिफ्टची वाट न पाहता जिन्याने उतरणाऱ्या सुध ीरने त्यांना एकत्र पाहिले आणि त्याच्या तळपायाची आग मस्तकात पोचली. आधीच ऑफीसातून निघायला उशीर झाल्याने तो चिडला होता आणि रमेश संगीताला एकत्र पाहून तो बिथरलाच. तो जिन्यातून दडदड खाली येईपर्यंत लिफ्ट पोचल्याने रमेश, संगीता लिफ्टमधून वर निघाले होते. त्यांना सुधीर दिसला नव्हता. परपुरुषाशी न बोलणारी संगीता रमेशबरोबर खिदळतेय, असं त्याला वाटलं. रमेशचं मिठास बोलणं आणि दिलखुलास हसणं तरुणींना आकर्षित करतं, याचा नेहमीच सुधीरला हेवा वाटायचा.

तो पुन्हा जिना चढून पाचव्या मजल्याकडे निघाला. संगीताला सोबत घेऊन घरी जायचं, रमेशला कटवायचं, असं त्याने ठरवलं. तेवढ्यात लाइट्स गेले. सगळीकडे अंधार पसरला आणि लिफ्टही तिसऱ्या-चौथ्या मजल्याच्या मध्येच अडकली. धड खालीही नाही, धड वरही नाही. संगीता घााबरून गेली. रमेश तिला धीर देत होता. 'वीजप्रवाह लवकरच सुरू होईल आणि आपण सुधीरकडे जाऊ' म्हणून सांगत होता.

इकडे सुधीरच्या मनातील संशयाच्या राक्षसानं विराट रूप धारण केलं. ऑफीसच्या अतिरिक्त कामाने आधीच चिडलेला, पोटात भुकेचा डोंब उसळलेला, त्यात 'अंधारात लिफ्टमध्ये आपली संगीता एकटीच रमेशबरोबर...' या विचाराने तो हैराण झाला. 'संशयात्मा विनश्यति' या न्यायाने त्याची बुद्धी भ्रष्ट झाली. त्याने वरच्या मजल्यावर लिफ्टच्या दाराशीच बसकण मारली आणि वीजप्रवाह सुरू होण्याची वाट बघू लागला.

'माझ्या संगीताला रमेशने अंधारात स्पर्श जरी केला असेल, तर मी दोघांनाही जिवंत सोडणार नाही', असा दुष्ट





विचार त्याच्या मनात ठाण मांडून बसला. अर्धा तास झाला तरी लाइट्स येईनात. दोघांनाही चांगला धडा शिकवतो, असे म्हणत अंधारातच तो खाली उतरला नि स्कूटर घेऊन घरी निघाला. संगीता कशी घरी येईल, याचा विचारही करण्याची गरज त्याला भासली नाही. उलट रमेशच्या मिठीत संगीता अंधारात अश्लील चाळे करते, असे दृश्य त्याच्या डोळ्यांसमोर नाच करू लागले. संगीताला जबर शिक्षा करायची, असे मनाशी ठरवून त्याने वेगाने स्कूटर घरी आणली.

आणखी पंधरा मिनिटांनी वीज आली. लिफ्ट पाचव्या मजल्यावर पोचली. ऑफीसात सर्वत्र सामसूम होती. रमेश-संगीता पुन्हा लिफ्टने खाली आले. रमेशने तिला स्कूटरवरून घरी पोचवले. त्याला सुधीरच्या संशयी स्वभावाची कल्पना होती. पण इतक्या अपरात्री संगीता एकटी घरी कशी जाणार?

स्कूटरचा आवाज ऐकून सुधीरने खिडकी उघडली. रमेशची बायको माहेरी गेल्याचे संगीताला माहीत होते. तिने रमेशला जेवून जाण्याचा आग्रह केला. सुधीरला उगीच काही वाटू नये, म्हणून तो जेवायला थांबला. लिफ्टमध्ये अंधारात अर्धा-पाऊण तास निष्कारण अडकून पडल्याबद्दल संगीता व रमेशने सुधीरला सांगण्याचा प्रयत्न केला. 'हूँ, हूँ' एवढाच प्रतिसाद मिळाला. आपण घरी गेल्यावर संगीतावहिनीची धडगत नाही, याची कल्पना रमेशला आलीच. तो मुकाट्याने जेवला व 'जातो' म्हणून निघूनही गेला.

सुधीरच्या मनात वादळ घुमत होते. रमेश जाताच त्याने दरवाजा बंद केला आणि सुडाग्नीनेक तो पेटला. संतापाने थरथरू लागला. त्याच्या डोळ्यांत रक्त उतरले होते. संगीताला जाणीव झाली की रमेशबरोबर आपण थांबलो हे सुधीरला आवडले नाही. तिने चटकन त्याचे पाय धरले. 'आपली काहीच चूक नाही'

हे सांगण्याचा ती प्रयत्न करू लागली.

"दूर हो कलंकिनी," सुधीरने लाथेनेच तिला ढकलले. "त्या अंधारात लिफ्टमध्ये मस्त एकमेकांना मिठ्या मारून मजा केलीत ना?"

"नाही हो, तुमच्या गळ्याची शपथ. आम्ही स्पर्शसुद्धा केला नाही परस्परांना. मी रमेशला राखी बांधते, भाऊबीजेला ओवाळते, तरीही तुमच्या मनात हा पापी विचार कसा आला हो?" संगीता रडत रडत खरे काय ते सांगण्याचा प्रयत्न करू लागली.

"शट अप. माझ्या गळ्याची शपथ घेऊन माझा गळा दाबतेस काय? रमेशचा काही निर्वाळा देऊ नकोस. तुमचे लग्नाआधीचेच हे संबंध असले पाहिजेत. नाहीतर तो तुझ्याशी एवढी सलगी का करतो?"

"उगीच गैरसमज नका हो करून घेऊ. तुम्हीच आपल्या लग्नानंतर माझी ओळख करून दिलीत ना? सरळ वागणारा, स्पष्ट बोलणारा आणि विनोदी स्वभावाचा म्हणून मी त्याला लगेच मोठ्या भावासारखा मानला. तुमच्याबरोबरच तो घरी आला, तेवढंच माझं त्याच्याशी बोलणं. तो खरंच सज्जन आहे हो."

"नालायक, वर त्याची तरफदारी करतेस? तू सुखासुखी खरं काय ते सांगणार नाहीस." असे ओरडत सुधीरने वेताची छडी काढली आणि सपासप संगीताच्या अंगावर ओढायला लागला. "ओरडलीस तर खबरदार, घे तुझ्या पापाचं प्रायश्चित्त." असं म्हणून तो वाटेल त्या ठिकाणी तिला मारू लागला.

"खरंच मी नाही रमेशला स्पर्श केला. माझ्या पोटातल्या, आपल्या होणाऱ्या बाळाची शपथ घेते मी. आमच्या दोघांच्याही मनात कोणतंच पाप नाही हो. तुमच्याशिवाय कोणताही पुरुष मला भावासारखा आहे. माझ्यावर थोडातरी विश्वास ठेवा.




नका मारू हो. तुमच्या पाया पडते मी. आपल्या बाळाला इजा होईल हो. रमेश माझा दादा आहे. आता कुणाची शपथ घेऊ मी? मी मरून जाईन तुमचं बाळ तरी जगू द्या. नका मारू हो." संगीता ओरडत होती. रडत होती. पण सुधीरला जराही दया नव्हती.

"अग सटवे, ते मूलही त्या चांडाळाचंच असेल. मरा, तुम्ही दोघंही मरा." सुधीरचा हात आणखी वेगानं चालू लागला.

मार मार मारल्यामुळे संगीता बेहोष होऊन वेडीवाकडी पडली. तरीही तिला लाथांनी तुडवत सुधीर घाणेरडे आरोप करतच होता. संशय आणि सुडाने त्याच्या मेंदूचा ताबा घेतला होता. बेहोषीतही विव्हळणाऱ्या संगीताला तशीच टाकून तो घराबाहेर पडला. दिवे विझवले. बाहेरून कुलूप लावलं आणि सरळ चालायला लागला. एकदा तरी संगीताने माझे नि रमेशचे पापसंबंध आहेत, असे कबूल करावे, असे त्याला वाटत होते; पण निष्कलंक संगीताच्या तोंडून अखेरपर्यंत ते निघाले नाहीत.

कधीही दारूला स्पर्श न केलेला सुधीर त्या बेभान अवस्थेत दारूच्या गुत्त्यावर पोचला. त्याने मनसोक्त ढोसली. मध्यरात्रीनंतर केव्हातरी लडखडत घरी आला आणि सरळ बिछान्यावर पसरला. संगीताचा जराही विचार त्याच्या मनात आला नाही.

सकाळी नऊच्या सुमारास त्याला जाग आली. आता त्याची नशा उतरली होती. काहीतरी चुकल्याची जाणीव त्याला झाली.

'आज लवकर या हं संध्याकाळी, लक्षात आहे ना लग्नाचा वाढदिवस?' सकाळी ऑफीसला निघालो तेव्हा किती उत्साहाने संगीता बोलली होती. आपल्याला खूप उशीर झाला

म्हणून आली शोधायला ऑफीसपर्यंत. लाईट्स गेले, लिफ्ट बंद पडली, यात तिचा काय दोष? एवढी पुन्हा पुन्हा हात जोडून कसलंही पाप केलं नाही म्हणून सांगत होती, तरी मी मुर्खासारखं तिला मारलं. खूपच मारलं. सीतासावित्रीसारखी पवित्र माझी संगीता. मी असा कसा राक्षस झालो काल? तिच्या पोटात माझं बाळ वाढतंय आणि मी तिला बेदम मारलं. चुकलो गं मी, संगीता. मला क्षमा कर. तुझं मन किती विशाल आहे आणि मी खूपच कोत्या विचारांचा आहे. आता मी एका लाडिवाळ बाळाचा बाबा होणार आहे आणि संगीता तू आई होणार आहे ना?' या विचारांनी सुधीरला खूपच उत्साह आला. तो चटकन कॉटवरून उठला आणि स्वयंपाकघरात गेला. 'ए संगीता' म्हणत म्हणत तो संगीताला शोधू लागला. ती स्वयंपाकघरात नव्हती. बाथरूममध्ये नव्हती. तेव्हा दूध आणायला केंद्रावर गेली असेल, असा विचार करून तो ड्रॉइंगरूममध्ये शिरला.

"संगीताऽऽऽ" तो खूपच जोराने ओरडला. रक्ताच्या थारोळ्यात ती निष्प्राण पडली होती. तिच्या उजव्या हातात रक्ताने माखलेला एक धागा मात्र घट्ट पकडून ठेवला होता. सुधीरने तिला हलवून पाहिलं; पण तिचं प्राणपाखरू केव्हाच उडून गेलं होतं.

"काय झालं हे? मी? मी खून केला माझ्या प्रिय संगीताचा?" सुधीर वेड्यासारखा भिरीभिरी पाहू लागला. टेबलावर पेपरवेटखाली संगीताच्या हस्ताक्षरात चिठ्ठी लिहिली होती -

*'प्रिय सुधीर,*

*हो, अजूनही फक्त तुम्हीच मला प्रिय आहात. आज मी लग्नाच्या वाढदिवसानिमित्त किती मनोरे रचले होते. आपलं गुपित मी मोठ्या कौतुकाने तुम्हाला सांगणार होते. पण आता मी तुमच्या विश्वासाला पात्र राहिले नाही ना? मग या*





*जगात तरी मी कशाला राहू? मला आणि तुमच्या बाळाला तुम्ही 'मरा' म्हणालात ना? पण एक गोष्ट लक्षात ठेवा, ते पापाचं फळ नाही. मी बाळासह कायमची जाते. पण या शेवटच्या क्षणीही तुमच्या मनातला संशय दूर व्हावा, हीच माझी इच्छा आहे. देवाला स्मरून सांगते, मी पापी नाही. बाळ तुमचंच आहे.*

*माझ्या रक्तात भिजवलेला हा धागा, ही माझी राखी माझ्या दादाच्या हातात - तुमच्या रमेशच्या हातात तुम्ही स्वतः बांधा या वर्षी. माझ्या मृत्यूनंतर एवढीतरी माझी इच्छा पूर्ण कराल ना? इतिहासात बहिणीच्या संरक्षणासाठी या धाग्याने खूप काही केलं आहे. आज माझ्या रक्षणाला माझा भाऊ येऊ शकत नाही, मला ठावूक आहे. पण तुमच्या संशयाच्या निराकरणासाठी हा धागा उपयुक्त ठरू दे. जन्माला येण्यापूर्वीच तुमचं बाळ हे जग सोडून गेलं आहे. त्याच्याबरोबर मी जाते. तुम्ही सुखी राहा. स्वतःला सांभाळा.*

*- तुम्हाला अप्रिय झालेली संगीता'*

"संगीताऽऽऽ, काय केलंस तू हे? चूक तर मी केली आणि शिक्षा तू भोगलीस. का? नाही संगीता, तू मला सोडून नाही जाऊ शकत. मी चुकलो गं. पुन्हा अशी चूक नाही करणार. तुला नाही त्रास देणार. माझ्याशी काहीतरी बोल गं. अगदी वाटेल तो दोष दे मला; पण काहीतरी बोल. मी एकटा कसा राहू तुझ्याशिवाय?"

सुधीरचा आक्रोश सुरू होता. आता तो पूर्ण शुद्धीवर होता. त्याला आपली चूक कळली होती. पण आता त्याचा काय उपयोग? होती कुठे संगीता त्याचा विलाप, आत्मनिर्भर्त्सना ऐकायला? ती केव्हाच अनंतात विलीन झाली होती आपल्या उदरातील जीवासह.

केवळ संशयानं सुधीरचा घात केला. तो हिंस्रपशू

बनला आणि त्यापायी दृष्ट लागण्यासारखा त्याचा छोटासा संसार उद्ध्वस्त होऊन गेला.

"संगीता, एकदाच माफ कर मला. आपण आपल्या पिलासह पुन्हा नवं घरटं उभारू. कधीच नाही छळणार मी तुला. नाही संशय घेणार असा मुर्खासारखा. बोल गं माझ्याशी. मला माफ केलं, एवढंतरी बोल."

सुधीर आक्रोशत होता. त्याचे बोल आसमंतात विरून जात होते फक्त.

पूर्वप्रसिद्धी :


१. 'साहित्यगंगा', दै. महाविदर्भ, अमरावती,
गुरुवार, दि. ९ सप्टेंबर, १९९३

आकाशवाणी प्रथम प्रसारण :

'ऐसी अक्षरे', आकाशवाणी नागपूर,
गुरुवार, दि. ४ जून, १९९२







# बाल्या झोळी बाल्मिकी ऋषी झाला

'झिंग नांग चिकांग, झिंग नांग चिकांग' टाळ-मृदुंगावर भजनाने जोर पकडला होता. भक्तगण तल्लीन झाले होते. बहुतेक भाविक डोळे मिटून माना डोलावत होते. बहुतेकांची तंद्री लागली. एखादीच्या अंगात आले होते. ती घुमत होती. मध्येच कुणीतरी 'बाल्मिकी बाबा कीऽऽ' असे ओरडत होता. त्याला 'जयऽऽऽ' असा उपस्थित जनसागर प्रतिसाद देत होता. अंगात आलेल्या आणि तंद्री लागलेलेही 'जयऽऽ' ओरडण्यात सामील होत होते आणि पुन्हा आपल्या तंद्रीत दंग होत होते.

दारावरच्या एका बाजूला मध्यभागी रत्नजडित सिंहासनावर बाल्मिकी महाराज बसलेले होते. 'क्यू'मध्ये उभे राहून अगणित भक्त बाबांचे दर्शन घेत होते. बाबा सर्वांना प्रसाद म्हणून स्वतः उष्टी केलेल्या फळांचे तुकडे तर अंगारा म्हणून चुलीतली राख चिमुट चिमुट देत होते. ताम्हणात ठेवलेल्या पाण्यात स्वतःच्या पायाचा अंगठा बुडवून ते तीर्थ भक्तांना प्राशन करण्यास देत होते. एक बाजूला तांब्याच्या गडव्यातही तीर्थ भरून ठेवले होते. ते तीर्थ म्हणजे, बाबांनी स्नान केले, त्यावेळी त्यांच्या अंगावरून निथळलेले पाणी होते. असा हा तीर्थप्रसाद भाविकभक्त अतिशय भक्तिभावाने प्राशन करीत होते. भक्तांच्या पाठीवरून बाबा हात फिरवून त्यांची दुःखे दूर करतात, अशी सगळ्यांची धारणा होती. स्त्रियांच्या - विशेषतः तरुण स्त्रियांच्या पाठीवरून बाबांचा हात बराच वेळ फिरत राही. अशा वेळी डोळे बंद करून स्पर्शसुख मुलींना दिले जाई. बाबा स्त्रियांकडे बघतही नाहीत, असा गवगवा होता.

बडी बडी श्रीमंत भक्त मंडळी आपली संपत्ती बाबांच्या चरणांवर उधळत होती, तर बाबांचे शिष्य ती गोळा करून पोत्यात भरण्याची तत्परता दाखवीत होते. पोते भरले की ते आतल्या तळघरात जात होते. सकाळी आठ वाजल्यापासून सुरू होणारा हा दरबार दुपारी बारा ते तीन बाबांच्या विश्रांतीसाठी बरखास्त होत असे. पुन्हा तीन वाजता सुरू होणारा दरबार रात्री आठ वाजेपर्यंत भरलेला असे. शेवटी शेवटी तर भक्तांची झुंबड लागली असे. अकरा रुपयांपासून अकरा हजार रुपयांपर्यंतची रक्कम बाबांच्या चरणांवर अर्पण करण्याकरिता रांगा लागायच्या. रात्री आठ वाजता भक्तांना प्रवेश बंद व्हायचा. मग सर्वत्र शांतता. बाबा आपल्या विरामगृहात शिसवी पलंगावर जाडजूड फोमच्या गादीवर आराम करायला जात. दिवसभराचा शिणवटा





घालविण्यासाठी आणि दुसऱ्या दिवसासाठी 'स्टॅमिना' टिकावा म्हणून काजू, बदाम, खारका, ताजी फळे असा भरपूर आहार घेत आणि मग मोठा ग्लास भरून मसाल्याचे केशरी दूध पीत. बाजूलाच त्यांचे खाजगीतले शिष्य आलेल्या दान रकमेची मोजदाद करून आयकराची झंझट टाळण्याचा मार्ग शोधत.

महिन्यातून एक दिवस बाबा स्वहस्ते दानधर्म करीत. भक्तांच्या अडीअडचणी ऐकून त्यावर मार्ग सुचवीत. गरीब, श्रीमंत, सामान्य, असामान्य, राजकारणी, व्यावसायिक, सरकारी अधिकारी, जुगारी, अड्डेवाले असे कोणीही बाबांजवळ आपली कैफियत सादर करीत. त्याच्या गरजप्रमाणे बाबा त्यांना आर्थिक मदत करीत. सल्ला देत. नोकरीतील बदलीपासून निवडणुकीच्या तिकिटापर्यंत, बँकेच्या कर्जापासून पेट्रोल पंप, गॅस एजन्सी मिळवून देण्यापर्यंत कोणतेही काम त्यांच्याकडून केले जाई. या कामात भेदभाव नसे. उच्च-नीच, श्रीमंत-गरीब, जात-धर्म याबद्दल कोणताही किंतु न ठेवता बाबा प्रत्येकाला मदत करीत. अगदी रस्त्यावरच्या भिकाऱ्यापासून सुशिक्षित बेकारापर्यंत आणि चपराशापासून उच्च पदस्थ अधिकाऱ्यापर्यंत सर्वांनाच योग्य ते दान मिळत असे. त्यामुळे काही नवे उद्योगधंदे सुरू होत. गरीब-गरजूंना काम मिळे. बेकारी आणि गरिबी निर्मूलनाचे कार्य काही प्रमाणात होत असे. देशाच्या आर्थिक प्रगतीत अप्रत्यक्षपणे हातभार लागत असे.

नियतीला हे मंजूर नसावे. एक दिवस अंधश्रद्धा निर्मूलन करणाऱ्या एका संघटनेने पोलिसांसह बाबांच्या दरबारावर धाड घातली. बेहिशेबी संपत्ती आणि अंगाऱ्याच्या साह्याने भक्तांची फसवणूक या आरोपाखाली बाबांना पकडून डांबण्यात आले.

वृत्तपत्रांतून बातम्या झळकल्या. बाबांच्या पूर्वजीवनावर प्रकाश टाकण्यात आला. बाल्मिकी महाराज म्हणजे पूर्वीचा बाल्या. दारिद्र्याशी झगडता झगडता त्याच्या तीन पिढ्या नेस्तनाबूत झाल्या

होत्या. घरात जेवायची सोय नसताना बाल्याचा बा त्याला शिकायला पाठवत होता. मुलगा चार बुकं शिकला तर घरातील सगळ्यांची खपाटीला गेलेली पोटं बाळसं धरतील, अशी त्याची वेडी आशा होती; पण चार बुकं शिकायला चार हजार खर्चून त्या बुकांचा उपयोग करण्यासाठी चाळीस हजार खर्चावे लागतात, ही गोष्ट बाच्या लक्षात आली नाही. स्वातंत्र्यलढ्यात लाठ्या सहन केलेल्या बाने प्रामाणिकपणा कधी सोडला नव्हता. मग अवैध मार्गाने तो संपत्ती कशी मिळवणार? परिस्थितीशी झगडताना पोट भरण्यासाठी बाल्याच्या बाच्या बाने हाती झोळी घेतली होती. बानेही ‘< भवती भिक्षांदेही’चाच मार्ग अनुसरला. त्यामुळेच मूळ आडनाव लुप्त होऊन आजोबांपासून बाल्याचे आडनाव ‘झोळी’ पडले होते. दारिद्र्याच्या, उपासमारीच्या आणि कुठल्यातरी रोगाच्या साथीत बाल्याचे सगळे खानदान उद्‌ध्वस्त झाले. एकटा बाल्याच ‘झोळी’ आडनाव लावण्यासाठी कसा जगला देवजाणे! चार मित्रांच्या, चार पैशांच्या मदतीने तो एम.ए. प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाला. चार सहृदांच्या साह्याने चार ठिकाणी नोकरीसाठी वणवण हिंडला. चाळीस पैसे ज्याच्या खिशात सापडायची मारामार, तो नोकरीसाठी चाळीस हजार कसे देऊ शकणार?

गरिबांचे दु:ख, निर्भर्त्सना, जातीची अडचण, धर्मभेद, भ्रष्टाचार यांविरोधात बाल्याने मोर्चे काढण्याचा प्रयत्न केला आणि सपशेल आपटला. सरळ मार्गाने पोट भरणे शक्यच नाही, तर गोरगरीब, दीनदलित, शोषितपीडितांना आपण काय न्याय मिळवून देणार? विचार करता करता बाल्याच्या डोक्यात एक दिवस लख्ख प्रकाश पडला.

गडगंज संपत्तीधारक, राजकारणी, सरकारी अधिकारी, भ्रष्टाचारी, जुगारी, अड्‌डेवाले, बियरबारवाले आणि स्टार हॉटेलवाले यांची बिंगे बाहेर काढून त्यांच लुटून तो पैसा तळागाळातील





प्रामाणिक, होतकरू, नडलेल्यांना दान म्हणून देण्याचा मार्ग त्याला सापडला. आपली पापे लपविण्यासाठीही बडी मंडळी एखाद्या साधूच्या शोधात असतात, हे त्याने अचूक हेरले आणि पंधरावीस दिवस दूर कुठेतरी जाऊन बाल्या झोळीचा बाल्मिकी ऋषी बनला. सुखनैव राज्य करू लागला.

मंत्री, आमदार, खासदार, बडे अधिकारी यांची देशाबाहेर जाणारी संपत्ती येनकेनप्रकारेण देशातच कामी यावी, म्हणून मोठमोठे उद्योग सुरू करण्याचा उपदेश त्याने दिला. मोफत रुग्णालये चालविण्याची प्रेरणा दिली. गरिबांना, बेकारांना काम मिळालं. दानधर्मातूनही बाल्या अनेकांची वाहवा मिळवू लागला. मोठ्यांच्या खिशातला माल काढायचा, गरजूंना द्यायचा. त्यामुळे व बाबांचा आशीर्वाद मिळाला, म्हणून दान देणाराही खूष आणि दानातून छोटामोठा धंदा सुरू करणाराही बाबांमुळे हे सगळं झालं, हे जाणून खूष.

प्रसंगी बाल्या झोळी उर्फ बाल्मिकी ऋषींना मोठ्या महाराजांचा आव आणावा लागे. फलहार, सुका मेवा चरावा लागे. शिसवी पलंगावर विश्रांती घ्यावी लागे. अंगाऱ्याच्या पुड्यासुड्या काढून बुवाबाजी करावी लागे. भक्तांच्या पाठीवरून हात फिरवावा लागे. जेणेकरून आपण खरोखरच महाराज आहोत, हे आम जनतेला पटायला हवं.

मध्येच बाबांना झालेली अटक. अटक गल्लीत झाली, पण घटनेने दिल्ली हादरली. दुसऱ्याच दिवशी हजारोंच्या संख्येने पोलीस ठाण्यांवर मोर्चे गेले. हिंदू, मुस्लीम, शिख, जैन, पारशी, बौद्ध अशी सगळ्या धर्मांची मंडळी मोर्चांमध्ये सामील झाली. श्रीमंत-गरीब, स्टार हॉटेलवाले-भिकारी, चित्रपटसृष्टीतील बडी मंडळी असे कितीतरी लोक मोर्चात नारे देत होते. मंत्री, खासदार, आमदार, पोलीस अधिकारी यांचे फोनवर फोन सुरू झाले. ‘बाबांना

सोडा, ते आम जनतेचे पिता आहेत. त्यांनी सगळ्यांचं भलं केलं आहे. बाबांच्या अटकेमुळे आमच्या धार्मिक भावना दुखावल्या, असे प्रत्येक धर्माची माणसं बोलायला लागली.


चमत्कार झाला. न्यायव्यवस्थेने दिल्लीचा आदेश मानला. बाबा सुटले. जयजयकार सुरू झाला - 'श्री संत बाल्मिकी महाराज की जयऽऽ.' क्वचित कुणी नाराजही झालं - विशेषतः अंधश्रद्धा निर्मूलन कार्य करणारी मंडळी. बाकी सगळे आनंदाने जल्लोश करीत होते. अनेकांची रोजीरोटी वापस मिळाली. अनेकांच्या उज्ज्वल भवितव्याची आशा उजळली. कोण बरोबर, कोण चूक हे सांगणं अवघड होतं; परंतु बाबांमुळे अनेक दिशाहिनांना दिशा मिळणार होती. काळा पैसा धार्मिक कार्याच्या नावाखाली बाहेर येणार होता. त्यातून राष्ट्रहिताची कामे होणार होती. देशातला पैसा बाहेर न जाता आपल्याच देशात राहिल्याने आर्थिक प्रगतीच्या दिशेने वाटचाल होणार होती. कदचित यासाठीच बाल्या झोळीचा बाल्मिकी ऋषी बनला होता.

पूर्वप्रसिद्धी :

१. 'साहित्य मैफील', दै. हिंदुस्थान, अमरावती, रविवार, दि. ११ फेब्रुवारी, १९९६








# पुरस्कार

"अहो, ऐकताय ना मी काय म्हणतेय ते?"

"काय म्हणतेस? आताशा ऐकायला जरा कमी येतं ना? चालायचंच म्हणा ते वयोमानानुसार. आता ही खाट पकडली आहे, तेव्हापासून ऐकणंच नशिबी आहे आमच्या."

"अहो, असं का म्हणता? मी काय एवढी कठोर बोलते का तुमच्याशी? ऐकत नाही का काही तुमचं?"

"तसं कुठे म्हटलं ग मी? आता पंचाहत्तरी उलटली. गेली पंचेचाळीस वर्ष एकत्र संसार केलाय आपण. एवढ्या प्रदीर्घ कालावधीत कितीतरी उन्हाळे-पावसाळे बघितलेत एकत्रितपणे आपण; पण तू कधी कठोर बोलल्याचं आठवत नाही मला."

"हो, आणि कधी गोडही बोलले नाही, असंच म्हणायचंय ना तुम्हाला?"

"तू काहीही बोललीस आणि कसंही वागलीस तरी मला ते नेहमी गोडच वाटायचं बघ."

"हो, माहीत आहे, माहीत आहे. उगीच हरभऱ्याच्या झाडावर चढवू नका हं. आयुष्यभर माझी प्रशंसाच करीत राहिलात तुम्ही आणि मी मात्र कधीच तुमचं कौतुक केलं नाही. तरीसुद्धा तुम्ही माझ्यावर भरभरून प्रेम केलंत हो!"

"अग, आपण उभयतांनी एकमेकांवर प्रेम केलं, म्हणून तर आजवर आहोत एकत्र. आता म्हातारपणी वियोग व्हायचा तो शेवटचाच."

"नका हो असं काहीतरी अभद्र बोलूत."

"मी जर आजारी पडलो नसतो, तर आताही आपण फिरायला गेलो असतो बागेत. शेजारीपाजारी हसले असते. म्हणाले असते, म्हातारपणी रोमान्स चाललाय ह्या दोघांचा. पण मजा आली असती, हो की नाही?"

"चला, काहीतरीच. पूर्वी एवढं फिरलोय आपण, तरी मन नाही भरलं तुमचं?"

"मन कसं भरेल ग? आयुष्याच्या अखेरच्या क्षणापर्यंत एकमेकांना साथ देण्याचं वचन दिलं होतं आपण. त्यात काही नुसता शब्दविलास नव्हता. अगदी अंतःकरणातून उगम पावलेला, न आटणारा प्रेमाचा झरा होता तो. अखंड वाहणारा झरा. मग आता या वयात आणि या आजारपणामुळे फिरायला जाता येत नाही, म्हणून मन भरलं म्हणायचं?"

"असू द्या हो. सगळ्याच गोष्टी बोलून दाखवायलाच हव्यात का? काही गोष्टी न बोलूनही नुसत्या उमजून घ्यायच्या असतात. आता आपली मुलं मोठी झाली आहेत. सुना आल्या





आहेत. नातवंडांना सांभाळण्याचं आपलं वय आणि मुलांसमोर असं हे शृंगारिक बोलणं शोभतं का? मला तर बाई लाज वाटते."

"हं, तू लाजतेस तेव्हा छान दिसतेस. पण त्यात कसली लाज? आईबाबांचं नितांत प्रेम आहे एकमेकांवर या वयातही, हा संदेश ह्या नव्या पिढीपर्यंत पोचलाच पाहिजे. नाहीतर आज या जगात काय घडतंय, ते बघतेच आहेस ना तू?"

"अगबाई, विसरलेच पाहा मी. खरंतर मी तुम्हाला काय सांगायला आले होते आणि बोलण्याच्या नादात कुठे वाहावत गेले?"

"आताही असे वाहावत जायचे दिवस आहेत वाटतं? जेव्हा आपलं नवीन नवीन लग्न झालं होतं, तेव्हाही तू अगदी अशीच वाहावत जायचीस ना?"

"जाऊ द्या हो ते. आधी माझं ऐका. हे बघा, आजच्या वर्तमानपत्रात तुमच्या फोटोसह बातमी आली आहे. आजवरच्या साहित्यसेवेबद्दल प्रतिष्ठित असा 'साहित्य संवेदना' पुरस्कार मिळाला आहे तुम्हाला."

"काय? मला पुरस्कार मिळाला आहे?"

"होय हो, तुम्हालाच मिळाला आहे, हा साहित्य क्षेत्रातला सर्वोच्च पुरस्कार."

"हाऽऽ हाऽऽ हाऽऽ."

"अहो, असे हसताय काय?"

"अग, पंचाहत्तरी उलटलेल्या ह्या म्हाताऱ्याला आता पुरस्कारांनी काही प्रोत्साहन मिळणार आहे का? अशा ह्या बिछान्याला खिळलेल्या अवस्थेत तो पुरस्कार स्वीकारायला तरी जाऊ शकेन का मी? खरंतर उमलत्या कलाकारांना, तरुणांना शासनानं किंवा विविध संस्थांनी अशी प्रोत्साहनपर पारितोषिके द्यायला हवीत."

"अहो, एवढी आयुष्यभर साहित्यसेवा केलीत तुम्ही.

त्याचा गौरव नको का व्हायला? आयुष्याचं सार्थक झाल्याचं समाधान नाही का मिळणार तुम्हाला या पुरस्कारामुळे?"

"हाऽऽ हाऽऽ, आता सगळे पुरस्कार शून्य आहेत, बरं का तुझ्या सेवेपुढे."

"चला, काहीतरीच काय बोलताय? पण मी काही बोलू का? आज मी तुम्हाला काहीतरी सांगणार आहे."

"हो सांग. आपण पुन्हा आजी-आजोबा होणार, ही गोड बातमी आहे का?"

"नाही हो, आज आपण आयुष्याच्या अखेरच्या उंबरठ्यावर उभे आहोत आणि आज मी तुम्हाला म्हणतेय, अभिनंदन बरं का! मनापासून अभिनंदन हा सर्वोच्च पुरस्कार मिळाल्याबद्दल."

"काय? तू अभिनंदन करते आहेस माझं?"

"हो. अगदी अंतःकरणातून. तुम्ही आजवर एवढी साहित्यसेवा केलीत; पण मी कधीच तुमच्या लेखनाची प्रशंसा केली नाही. खरं ना? उलट खूप नावं ठेवायची मी तुमच्या साहित्याला. आज मात्र मन उघडं करते आहे हो. खरंतर खूप आवडायचं तुम्ही लिहिलेलं मला. अभिमान वाटायचा मला तुमच्या लिखाणाचा. अशीच छान किंबहुना यापेक्षाही अधिक दर्जेदार साहित्यनिर्मिती तुमच्या लेखणीतून व्हावी आणि तुम्हाला विविध पुरस्कारांनी सन्मानीत करण्यात यावं, तुमचे सत्कार व्हावेत, तुम्ही सतत पुढे जावं, असं मला मनापासून वाटायचं; आणि म्हणूनच मी कधी तुमची प्रशंसा केली नाही. उलट नावंच ठेवली तुमच्या साहित्याला वेळोवेळी. पण आज खरंच सांगते, तुम्ही खूप छान लिहिता हो. आज ह्या पुरस्काराची बातमी वाचून मला आभाळभर आनंद झालाय हो."

"पुरे, पुरे आता. तुझे आनंदाश्रूही रडवतील बरं





मला. तुला काय वाटतं? तू माझ्या लिखाणाला नावं ठेवायचीस, तेव्हा मी खरंच नाराज व्हायचो? अग, मला तेव्हाही कळत होतं, तुझं माझ्यावरचं अकृत्रिम प्रेम. वरवर जरी तू माझ्या लिखाणावर टीका करायचीस, तरी मनातून तू प्रशंसाच करत असायची, हे मी तेव्हाच ओळखलं होतं. पण जे शब्द ऐकण्यासाठी माझे कान पंचेचाळीस वर्षांपासून आसूसले होते, ते शब्द आज कानी पडले. आजचं तुझं अभिनंदन मला किती सुखावून गेलं, हे मी तुला शब्दांत नाही सांगू शकणार. तू आयुष्यात प्रथमच माझं केलेलं हे अभिनंदन आणि ही वर्षानुवर्षांपासून मनात साठवलेली माझी प्रशंसा आजवर मला मिळालेल्या कोणत्याही पुरस्काराच्या तुलनेत सर्वश्रेष्ठ आहे. तुझं हे मन माझ्यासमोर उघडं झालं नसतं तर प्राणही अडकला असता माझा. आज मी मनोमन तृप्त झालो. समाधानी झालो. सार्थक झाल्यासारखं वाटतंय माझ्या लिखाणाचं."

तिच्या डोळ्यातून नकळत निघालेला आनंदाश्रू अगदी अलगद पिकल्या पानाच्या सुरकुत्या पडलेल्या गालावर ओघळला आणि ते गालही कृतकृत्य झाले.

पूर्वप्रसिद्धी :

१. 'साहित्य मैफील', दै. हिंदुस्थान, अमरावती, रविवार, दि. २१ जुलै, २००२

समाप्त